

# श्री साईलीला

मे

५०

१९७१

# श्री साईलीला मे १९७१

मराठी विभाग :


१ संपादकीय

२ वेंचक सुमानांचा हार

३ श्री साईस्तवराज अध्याय

४ कविता —

(१) श्री साईस
(२) भक्ति-गीत
(३) आरती
(४) मानून प्रभु तुज प्रभूच गाइल तुझ्या भक्तीचे गीत

५ श्रीसाईस्तोत्र

६ श्रीराम प्रभूचा साक्षात्कार

७ श्रीराम नाम महात्म्य

८ श्रीरामायण-एकात्मता

९ अहल्योद्धार

१० शाहीर खाडिलकर यांच्या शंका व त्यांचे निरसन

११ साध्वी उर्मिला

१२ विनंती


इंग्रजी विभाग :


1 Editorial
2 Shirdi Sai Baba
3 Thoughts to ponder over
4 Basic structure of religions in Danger
5 Sadashiv Brahmendra
6 The chain letter
7 Obituary



# श्रीसाईवाक्सुधा

चैतन्य आहे त्रिगुणात्मक । पारमार्थिक आणि व्यवहारिक ।
आणिक पहा प्रतिभासिक । हे वत्सा नारायण ॥ ७९ ॥
जैसा एकचि देह जाण । भोगितो अवस्था तीन ।
वृद्ध तारुण्य बालपण । तोच प्रकार येथींचा ॥ ८० ॥
पारमार्थिक चैतन्याची । ज्या आत्म्या आली साची ।
योग्यता नाना तयाची । होत गणना साधूंत ॥ ८१ ॥
जे सशास्त्र करिती वर्तन । त्याज्यात्याज्य जाणून ।
त्या आत्म्यालागून । व्यावहारिक म्हणावे ॥ ८२ ॥
जे असत्या सत्य मानिती । जे अज्ञानपटलें झांकले असती ।
नाना ऐशा आत्म्याप्रती । प्रतिभासिक म्हणावे ॥ ८३ ॥
प्रतिभासिक तें अज्ञान । व्यावहारिक ते सज्जन ।
पारमार्थिक ते संत जाण । परि आत्माच कारण अवघ्यांसी ॥ ८४ ॥

**—श्रीदासगणूकृत अथ श्री संत कथामृत,--अ० ५७.**

---


श्रीसाईलीला

[ शिरडी संस्थानचे अधिकृत मासिक. ]

**वर्ष ५० वे ]** **मे १९७१** **[ अंक २ रा**

: संपादक :

**श्री. का. सी. पाठक**

वार्षिक वर्गणी रु. ५ ( ट. ख. सह )

**टे. नं. ४४३३६१**

: कार्यालय :

**साईनिकेतन, डॉ. आंबेडकर रोड, खोदादाद सर्कल जवळ,**
**प्लॉट नं ८०४ बी, दादर, मुंबई १४**

# ० संपादकीय ०

**झुणकाभाकर :**

श्रीसाईलीलेच्या जन्मापासून चालत आलेल्या प्रथेस अनुसरून गेल्या रामनवमीनंतर श्रीसाईलीलेचा प्रसिद्ध होणारा हा अंक विशेष अंक म्हणून आम्ही आज वाचकांस सादर करीत आहो. रामनवमी होऊन बरेच दिवस झाले असले तरी शास्त्रविधीस अनुसरून चालणारा आमचा वाचकवृंद त्यास संकल्पपूर्वक विनंती केली गेल्याशिवाय त्याच्यासमोरील प्रसादाचा आस्वाद घेणार नाही म्हणूनच नेहमीच्या प्रथेस अनुसरून वाचकांसमोर ठेवलेल्या प्रसादाचा संकल्प सोडून वाचकांनी त्याचा आस्वाद घ्यावा अशी आम्ही त्यांची प्रार्थना करीत आहो.

हा आम्ही वाचकांस देत असलेला प्रसाद साध्या झुणकाभाकरीचा आहे. त्याचे एक कारण म्हणजे अमृतपूर्ण पंचपक्वान्नांचे भोजन आमच्या अतिथिदेवांस देण्याचे सामर्थ्य आमच्यात नाही. दुसरे कारण म्हणजे आमचे बरेचसे अतिथी आमजनतेतील असून निरनिराळ्या धर्मांचे, निरनिराळ्या पंथांचे, निरनिराळ्या आचारविचारांचे असल्यामुळे त्यांना पंचपक्वान्नांच्या नैवेद्या-पेक्षा साध्या झुणकाभाकरीचा प्रसाद अधिक आवडेल अशी आमची आपली एक भोळी श्रद्धा आहे.

तसे पाहिले तर सर्वांना आवडेल व सर्वांना पुरेल अशा तऱ्हेचा झुणकाभाकरीचा प्रसाद तयार करण्याचे काम मुळीच सोपे नाही. झुणक्यास योग्य असा स्वाद व चव आणणे हे काम कठीण आहे, आणि झुणक्यास रुचकर चव न आल्यास त्याच्याकडे कोणी पहातही नाही. उत्तम झुणका करणे व त्याने बुभुक्षितच नव्हे तर इतरांस आकर्षून घेणे हे काम अत्यंत

अनुभवी व कुशल आचारी वा गृहिणीच करू शकते. भाकरी भाजण्याचे-लष्करच्या भाकरी नव्हे - कामही अत्यंत कुशलतेचे असते हे आमच्या स्त्रीवाचिका अनुभवाने जाणत असतील, आमच्या पुरुषवाचकांना त्यांच्या गृहस्वामिनींकडून वेळोवेळी सांगितले गेले असेलच. भाकरी थापटण्यापासून अडचण असते. त्याला पोळपाट लाटणे सहाय्य करू शकत नाही. विस्तवावर भाजण्याचे काम तर अधिक अवघड. विस्तव अतिशय मंद वा अतिशय धगधगीत असून चालत नाही, आणि हात पोळत असले तरी भाकरी सारखी हलवावी लागते. नाहीतर ती करपून वा जळून जाण्याची व तिचा पापुद्रा योग्य न सुटण्याची भीति असते, आणि जळलेली वा करपलेली भाकरी आपल्या यजमानांच्या पानात वाढण्याचे धाष्टर्य कोणती सुगृहिणी करील ?

असे असता आज आम्ही आपणांस झुणकाभाकरीचा प्रसाद द्यावयाचे धाष्टर्य करीत आहो याचे कारण की आम्हांस सव्यसाची व कुशल साहित्यिकांचे भरपूर सहाय्य आहे. हे आमच्या वाचकांस ह्या अंकावरून सहज कळेल. श्रीरामचंद्राला शंका विचारतो म्हणून शंकांच्या निरसनाऐवजी जबाब द्यावयास लावणारे सव्यसाची शाहीर खाडिलकर, ऊर्मिलेच्या बाबतीत इतका अन्याय झाला आहे की तिच्यासारखे जीवन कोणत्याही स्त्रीच्या वाटेस येऊ देऊ नको असे परमेश्वराला सांगणाऱ्या कुमारी चिपळूणकर, प्रसादयुक्त व सोप्या भाषेत गीताज्ञानाचा आविष्कार करणारे डॉ. परांजपे, नामदेव व इतर संतांवर अधिकारवाणीने लिहू शकणारे कविटकर, श्रीयुत मांजरेकर, श्री. चिपळुणकरगुरुजी, श्री. दाणी, श्री. पोतनीस, डॉ. गव्हाणकर, श्री. टिपणीस हे व यांच्यासारखे असलेले साईबाबांचे असंख्य निस्सीम भक्त यांच्या सहाय्यामुळेच आम्ही हा खटाटोप केला आहे, व निर्णय-सागर प्रेसचे मॅनेजर श्रीयुत मोरे व त्यांचे सहाय्यक यांच्या परिश्रमांमुळेच आजच्या या स्वरूपात आम्ही आपणांसमोर उभे राहू शकलो आहो. या सर्वांचे आम्ही मनःपूर्वक आभारी आहो.

अंकात अनेक उणीवा आहेत. तो यापेक्षा अधिक सुंदर स्वरूपात, अधिक भारदस्तपणे व व्यापक स्वरूपात वाचकांसमोर सादर करावयास हवा होता याची आम्हांस जाणीव आहे. परंतु त्यास नाइलाज आहे. अंकाचा विस्तार करून व त्यात इंग्रजी विभाग घालून अगोदरच आम्ही एक धाडस

केले आहे. आता इच्छा अशी आहे की वाचकांकडून वेळीच प्रतिसाद मिळून मासिकाच्या ग्राहकांची संख्या वाढून पोट फुगवणाऱ्या बेडकीच्या गोष्टीतील बेडकीप्रमाणे आमची अवस्था न होवो म्हणजे झाले !

अंकात एक मोठी उणीव आहे. ती म्हणजे प्रभु रामचंद्राचे दोन उत्कट सेवक श्रीहनुमान व श्रीरामदास यांचा अनुल्लेखाने घेण्यात आलेला परामर्श. आमच्या लेखकांकडून या दोघांच्याही संबंधी भरपूर लेख येतील अशी आमची अपेक्षा होती. पण ते काहीच आले नाहीत. असे का झाले हे सांगता येत नाही. ही उणीव वेळीच आमच्या ध्यानी आली होती व ती आपण पुरवावी असा विचार मनात आला होता. परंतु तसे केल्यास कदाचित योग्य गोष्ट योग्य माणसानेच केली पाहिजे असा कटाक्ष असलेल्या श्रीमारुतिरायांस व प्रभु श्रीरामचंद्र व श्रीहनुमन्त यांची सर्व आध्यात्मिक व व्यवहारिक शिकवण आत्मसात केलेल्या श्रीरामदासस्वामींस आवडावयाचे नाही असे वाटल्यावरून आम्ही आमचा विचार रद्द केला. आता या उणीवेची भरपूर भरपाई करण्याची योजना आम्ही आखली आहे ती ही की साईलीलेच्या वाचकांकडून खालील विषयांवर स्पर्धात्मक लेख मागवावे व जे लेख उत्कृष्ट ठरतील ते श्रीसाईलीलेच्या अंकांत प्रसिद्ध करून त्यांचा योग्य असा परामर्ष शिरडी संस्थानच्या व्यवस्थापकांकडून घेतला जाईल अशी तजवीज करावी:

१) श्रीमारुतीराय व शासकीय वा अन्य सेवकांसाठी त्यांनी घालून दिलेले आदर्श,

व २) श्रीरामदास व त्यांनी व्यवहारिक बाबींबद्दल केलेले निरूपण.

लेख इंग्रजीत वा मराठीत हजार ते बाराशे शब्दांचा असावा. तो कागदाच्या एका बाजूवर प्रचलित शुद्धलेखन पद्धतीत लिहिलेला असावा. तो एका पाकिटात घालून त्या पाकिटाच्या शिरोभागी 'साईलील लेखन स्पर्धेसाठी पाठविलेला लेख ' असे लिहिलेले असावे. पाकिटाच्या मध्य-भागी लेखाचे शीर्षक व त्याखाली लेखकाचे संपूर्ण नाव व पत्ता असावा. लेख असलेले पाकीट बंद केलेले असावे व ते बंद पाकीट दुसऱ्या पाकिटात घालून ते पाकीट त्यास योग्य किंमतीची तिकिटे लावून संपादक, श्रीसाईलीला, साई-निकेतन, डॉ. आंबेडकर रोड, खोदादाद सर्कल जवळ, फ्लॅट नं ८०४ बी., दादर,

मुंबई १४ या पत्त्यावर दिनांक १ जुलै १९७१ किंवा तत्पूर्वी मिळेल अशा बेताने पाठवावे.

वाचकांना ही योजना आवडली तर अशाच दुसऱ्या योजना आखावयाचा आमचा विचार आहे.

**सालाबादप्रमाणे :**

शिरडी संस्थानच्या सेवकांच्या परिश्रमामुळे, साईबाबांच्या आशीर्वादाने व साईभक्तांच्या सहकार्यामुळे शिरडी येथे रामनवमीच्या वेळी होणारे उत्सव, श्रीसाईसच्चरित या ग्रंथाचे अखंड वाचन, ग्रंथाची मिरवणूक, संदलाची मिरवणूक, श्री. निमोणकर व श्री दामूशेट कासार ( रासने ) यांच्या निशाणांची मिरवणूक, रथ व पालखी याच्या मिरवणुकी, मशीदीवरील ध्वजारोपण व श्रीराम जन्मोत्सवासंबंधीची श्री. अनंत महाराज आठवले यांची सुश्राव्य कीर्तने हे सर्व कार्यक्रम यंदा दिनांक २ ते ४ एप्रिल १९७१ रोजी सालाबादप्रमाणे यथासांग पार पडले. भक्तजनही या उत्सवात मोठ्या प्रमाणात सहभागी झाले होते, जवळ जवळ पंचवीस हजार लोक या उत्सवासाठी शिरडीस आले होते, व त्यांचे आतिथ्य, आरोग्य व प्रवास व्यवस्थेसाठी शिरडी संस्थानचे सेवक व इतर सर्व संबंधित अधिकारी दक्ष होते. या उत्सवाचे तपशीलवार वर्णन यथावकाश श्रीसाईलीलेत प्रसिद्ध केले जाईल. परंतु या उत्सवाच्या निमित्ताने मनात विचार येतात की १९१२ पासून नियमितपणे–संदल व निशाणांच्या मिरवणूकी तर १८९७ पासून दरवर्षी अव्याहतपणे चाललेल्या आहेत– या होणाऱ्या उत्सवांची फलश्रुती काय आहे. संस्थानच्या सेवकांच्या दृष्टीने विचार केला तर त्यांना साईभक्तांच्या सेवेचा लाभ व त्यापासून उत्पन्न होणारा निरामय आनंद सालोसाल मिळत असतो. संतश्रेष्ठ दासगणूमहाराज यांनी सुरू केलेली व चालविलेली परंपरा पुढे चालवून सद्गुरुसेवेचा लाभ त्यांचे शिष्य ह. भ. परायण डॉ. अनंराव आठवले यांना होत असतो. परंतु सर्वसाधारण यात्रेकरू भक्तांच्या दृष्टीने विचार केल्यास शिरडी यात्रेचा त्यांस विशेष लाभ काय होतो. साईसमाधीचे दर्शन, साईबाबांस वंदन व तीनचार दिवस साईमय झालेल्या शिरडी येथील पवित्र वातावरणात निरामय निष्काळजी वृत्तीने केलेला वास हा लाभ

काही कमी आहे असे नाही. तो सर्व भक्तजनांस मिळतो. काही भक्तजन आपल्या आर्थिक व व्यवहारिक अडचणी श्रीसाईनाथांपुढे मांडून आपल्या अंतःकरणातील श्रद्धेमुळे त्यांचे निराकरण कसे करता येईल वा त्यांस आपणांस तोंड कसे देता येईल त्याबद्दल स्फूर्ती मिळवितात. परंतु यापेक्षा अधिक चिरंतन स्वरूपाचा लाभ जो सर्वांस मिळावयास पाहिजे त्यापासून निदान ऐंशी टक्के लोक वंचित रहातात. त्याचे मुख्य कारण हे की अशा यात्रेचे उत्सवाचे खरे उद्देश त्यांनी समजून घेतलेले नसतात व आवश्यक त्या निरामय निर्लेप वृत्तीने त्यांनी उत्सवात भाग घेतलेला नसतो. अशा उत्सवांचा मुख्य उद्देश असा असतो की आपण आपल्या आराध्य देवतेकडे नित्यनियमाने जाऊन तिचे दर्शन घेऊन तिला आत्मनिवेदन करून भक्तीने आठवावे. आत्मनिवेदन हे निर्व्याज व संपूर्ण असावयास पाहिजे. ते अगदी मोकळ्या मनाने व निर्हेतुक केलेले वस्तुस्थितीचा आढावा देणारे असले पाहिजे. गेल्या भेटीपासून आताच्या भेटीपर्यंत आपण केलेल्या सर्व कृत्यांची तेरीज त्यात असली पाहिजे व त्याचप्रमाणे पुढील भेटीपर्यंत आपण काय व कसे करावयाचे योजले आहे याचेही निवेदन त्यात असावयास पाहिजे. व्यवहारिक उद्योगात यशस्वी व्हावयास वा मिळालेले यश टिकविण्यास आपणांस आपल्या आयव्ययाचा आढावा वरचेवर घ्यावा लागतो व त्याचप्रमाणे पुढील वर्षासाठी अंदाजपत्रक करावे लागते. हीच गोष्ट आपल्या आध्यात्मिक जीवनाच्या बाबतीत अवश्य आहे. परंतु दुर्दैवाने आपणांपैकी पुष्कळांस ही गोष्ट समजलेली नसते, समजली तरी ती आचरणात आणण्याचे धैर्य काही जणांना नसते, त्यामुळे अशा सालोसाल होणाऱ्या उत्सवांत वा सत्पुरुषांच्या वा आपल्या आराध्य देवतांच्या जयन्त्यांत आपण नियमितपणे भाग घेतला तरी त्यांच्या खऱ्या लाभापासून आपण दूर राहतो. तरी आमच्या वाचकांपैकी जे वाचक शिरडी, पंढरपूर, आळंदी वगैरे क्षेत्रांच्या वाऱ्या नियमितपणे करीत असतील, तेथे होणाऱ्या उत्सवांत भाग घेत असतील त्यांनी असल्या उत्सवांचे, वाऱ्यांचे व यात्रांचे खरे उद्देश समजून घ्यावे व त्यांपासून मिळणारा चिरंतन लाभ मिळविण्याचा प्रयत्न करावा अशी आमची त्यांस प्रार्थना आहे.

**हरेकृष्ण पंथ :**

पाच वर्षांपूर्वी स्वामी प्रभुपाद यांनी श्रीचैतन्य महाप्रभू यांच्या वैष्णव पंथाचे बीजारोपण अमेरिकेत केले आणि त्यास आता चांगली पालवी फुटली आहे. अनेक विदेशी तरुण या पंथाचे अनुयायी होऊन भगवद्गीतेच्या अध्ययनात व कृष्णाचे भजनात निमग्न झाल्याचे दिसत आहे. मार्च महिन्याच्या शेवटी या पंथाच्या विदेशी अनुयायांनी मुंबई येथील क्रॉस मैदानावर 'हरेकृष्ण महोत्सव' केला व त्याची सांगता ४ एप्रिल रोजी केली. भगवद्गीतेचा वा कृष्णभक्तीचा प्रादुर्भाव परधर्मीय व परराष्ट्रांत रहाणाऱ्या तरुणांवर पडणे अशक्य नाही. आणि तसा तो खरोखरच पडत असल्यास आनंदच आहे. परंतु भगवद्गीतेचा वा भगवद्भक्तीचा खरा अर्थ समजून घेण्यास व खरा आनंद मिळविण्यास आम्हांस परकीयांच्या सहाय्याची गरज नाही असे आम्ही म्हटले तर खास अनुचित होणार नाही. दिनांक ४ एप्रिल १९७१ च्या महाराष्ट्र टाइम्समध्ये प्रसिद्ध झालेल्या आपल्या लेखात श्री. अशोक जैन लिहितात, " हे एक वरवरचे फॅड आहे की खरोखरच या मंडळींना दिव्यत्वाची प्रचीति आली आहे हे सांगणे कठिण. ...............भगवद्गीतेचा अर्थ लावणारे मूर्ख आहेत, भगवद्गीता आहे तशीच वाचावी, मनन करावी असं म्हणणाऱ्यांना यांतील कितीजणांना भगवद्गीता खरोखरच समजली आहे अशीही शंका मनास चाटून जाते. यांच्या स्वामींना भेटलं, तेथलं वातावरण पाहिलं की पु. ल. देशपांडे यांच्या 'असा मी असा मी' मधील एका गुरूच्या तथाकथित आध्यात्मिक वातावरणाच्या वर्णनाची आठवण येते." हे उद्गार निश्चित मननीय आहेत.

# वेंचक सुमनांचा हार

( १ )

**अथ ध्यानम्**

ध्यायेदाजानुबाहुं धृतशरधनुषं बद्धपद्मासनस्थं
पीतं वासो वसानं नवकमलदलस्पर्धिनेत्रं प्रसन्नम् ।
वामाङ्कारूढसीतामुखकमलमिलल्लोचनं नीरदाभं
नानालंकारदीप्तं दधतमुरुजटामंडनं रामचंद्रम् ॥

**इति ध्यानम्**

चरितं रघुनाथस्य शतकोटिप्रविस्तरम् ।
एकैकमक्षरं पुंसां महापातकनाशनम् ॥ १ ॥
ध्यात्वा नीलोत्पलश्यामं रामं राजीवलोचनम् ।
जानकीलक्ष्मणोपेतं जटामुकुटमंडितम् ॥ २ ॥
सासितूणधनुर्बाणपाणिं नक्तं चरान्तकम् ।
स्वलीलया जगत्त्रातुमाविर्भूतमजं विभुम् ॥ ३ ॥

**—श्रीरामरक्षास्तोत्र**

( २ )

आदौ रामतपोवनादिगमनं हत्वा मृगं काचनम्
वैदेहीहरणं जटायुमरणं सुग्रीवसंभाषणम् ॥
वालीनिर्दलनं समुद्रतरणं लंकापुरीदाहनं ।
पश्चाद्रावणकुंभकर्णहननं एतद्धि रामायणम् ॥ १ ॥

**—एकश्लोकी रामायण**

(३)

जो अवतारांचे मूळपीठ । जो वीरवृत्ती अति उद्भट ।
तो अवतारांमाजी श्रेष्ठ । अतिवरिष्ठ श्रीराम ॥ ४४ ॥

पापें पळती रामनामें । नामांकित वंदिजे यमें ।
गणिकेचीं कर्माकर्में । श्रीरामनामें निर्दळिलीं ॥ ४५ ॥

नामें कळिकाळासी धाक। यमदूतां न मिळे भीक ।
रामनामगजरें देख । पळे निःशेख जन्ममरण ॥ ४६ ॥

जो देवांचे बंद सोडी । नवग्रहांची बेडी तोडी ।
जेणें रामराज्याची रोकडी । उभविली गुढी तिहीं लोकीं ॥ ४७ ॥

ज्याचेनि शिळा तरती सागरीं । असुर मारिले वानरीं ।
जेणें सुवर्णाची नगरी । वोपिली पुरी शरणागतासी ॥ ४८ ॥

जो प्रतापाचा मरगळा । जेणें सेतु बांधिला अवलीला ।
चरणीं उद्धरिली शिळा । जो निजजिव्हाळा निजभक्तां ॥ ४९ ॥

तो अवतार मूर्तिमंत । राया अद्यापि असे वर्तत ।
हा संवाद त्रेतायुगांत । द्रुमिल सांगत विदेहासी ॥ २५० ॥

यालागीं श्रीराम श्रीजयराम । नित्य जपे जो हें नाम ।
तो पुरुषांमाजीं पुरुषोत्तम । कर्माकर्म अतीत तो ॥ ५१ ॥

तें रामनाम अवचटें । भीतरीं रिघे कर्णपुटें ।
तैं कलिमळांचीं मळकटें । नामोद्धाटें नासती ॥ ५२ ॥

ऐसी रामनामाची ख्याती । जगदुद्धारें केली कीर्ती ।
धन्य धन्य जे परिसती । धन्य जे गाती रामचरित ॥ ५३ ॥

**श्री एकनाथी भागवत, अध्याय चवथा.**

(४)

आमुचे कुळीं रघुनाथ । रघुनाथें आमुचा परमार्थ ।
जो समर्थांचाहि समर्थ । देवां सोडविता ॥ २१ ॥

० ० ०

मनीं धरावें तें होतें । विघ्न अवघेंचि नासोनि जातें ।
कृपा केलिया रघुनाथें । प्रचित येते ॥ ३० ॥

० ० ०

रघुनाथ स्मरोनि कार्य करावें । ते तत्काळचि सिद्धी पावे ।
कर्ता राम हें असावें । अभ्यंतरीं ॥ ३३ ॥

कर्ता राम मी नव्हे आपण । ऐसें सगुण निवेदन ।
निर्गुणीं तें अनन्य । निर्गुणचि होइजे ॥ ३४ ॥

मी कर्ता ऐसें म्हणतां । कांहीं च घडेना सर्वथा ।
प्रचित पाहासी तरी आतां । सीघ्रचि पाहें ॥ ३५ ॥

० ० ०

आपण आहे दो दिसांचा । आणि देव बहुतां काळांचा ।
आपण थोडे वोळखिचा । देवासी त्रैलोक्य जाणे ॥ ३८ ॥

याकारणे रघुनाथभजन । त्यासी मानिती बहुत जन ।
ब्रह्मादिक आदिकरून । रामभजनीं तत्पर ॥ ३९ ॥

**—दासबोध, द. ६ स. ७**

(५)

राम-भक्तिवीण आन नाहीं सार । साराचें सार हे रामनाम ॥ १ ॥
कल्पना विस्तारू होत असे सत्वरू । आम्हां कल्पतरू चाड नाहीं ॥२॥
कामनेलागोन विटलेंसे मन । तेथें चाड कोण कामधेनू ॥ ३ ॥
चिंता नाहीं मनीं राम गातां गुणीं । तेथें चिंतामणी कोण पुसे ॥ ४ ॥
कदा नाहीं नाश स्वरूप सुंदरे । तेथें आम्हां हिरे चाड नाहीं ॥ ५ ॥
रामदास म्हणे रामभक्तीविणें । जाणावें तें उणें सर्व कांहीं ॥ ६ ॥

**—स्फुट अभंग, रामदास**

(६)

बैसोनि निवांत शुद्ध करीं चित्त । तया सुखा अंतपार नाहीं ॥ १ ॥
येऊनि अंतरीं राहील गोपाळ । सायासाचें फळ बैसलिया ॥ २ ॥

रामकृष्ण हरी मुकुंद मुरारी । मंत्र हा उच्चारी वेळोवेळां ॥ ३ ॥
तुका म्हणे ऐसें देईन मी दिव्य । जरी होईल भाव एकविध ॥ ४ ॥

रामनामाचे पोवाडे । अखंड ज्याची वाचा पढे ॥ १ ॥
धन्य तो एक संसारी । रामनाम जो उच्चारी ॥ २ ॥
रामनाम गर्वे वाचा । काळ आज्ञाधारक त्याचा ॥ ३ ॥
तुका म्हणे रामनामीं । कृतकृत्य झालों आम्हीं ॥ ४ ॥

**— स्फुट अभंग, तुकाराम**

(७)

सखया रामा, विश्रांति तुझिये नामीं । म्हणउनि मजला ने
त्वरें निजसुखधामीं ॥ सखया० ॥ध्रु० ॥

अवचट सु-कृतें नर-देहा झाली भेटी ।
पशु-सुत-जाया-धन-धामीं प्रीती मोठी ॥
माझीं माझीं म्हणुनि म्यां धरिलीं पोटीं ।
यांच्या संगे भोगिल्या दुःख कोटी ॥ सखया. ॥ १ ॥

सोडुनि स्वहिता धांवलों दिशा दाही ।
शव-वत झालों मागुता कौतुक पाहीं ॥
परि खळ जन हे नेदिती कवडी तेही ।
परि हे आशा पापिणी लाजत नाहीं ॥ सखया. ॥

जंवतरि दृढता तंववरी या तनुची प्रीती ।
जर्जर झाल्या निंदक हे अवघे होती ॥
यांचीं दुःखें तुजला मी सांगूं किती ।
म्हणउनि येतो श्रीधर काकुळती ॥ सखया. ॥

**—श्रीधर**

(८)

संतती संपत्ती वाढे होय हित । प्रेमें गातां गीत श्रीरामाचें ॥ १६४ ॥
न बाधे पर्जन्य न बाधे वात । प्रेमें गातां गीत श्रीरामाचें ॥ १६५ ॥
धन्य धन्य होय संसारीं जीवित । प्रेमें गातां गीत श्रीरामाचें ॥ १६६ ॥

काळापासूनीही नव्हे चित्त भीत । प्रेमें गातां गीत श्रीरामाचें ॥ १६७ ॥
अंतीं वसे स्वर्गीं अमृतातें पीत । प्रेमें गातां गीत श्रीरामाचें ॥ १६८ ॥
श्रीरामातें ध्यावें, श्रीरामातें गावें । श्रीरामातें भावें आठवावें ॥ १६९ ॥
श्रीराम दयेचा मेघ त्या समोर । प्रेमें दास मोर नाचताती ॥ १७० ॥

**सीता-गीत, मोरोपंत.**

(९)

येना असें भरत देखुनि राम-राया ।
गंगातटीं रचुनि दर्भ बसे मराया ॥
पाहे वसिष्ठ-मुनि-वक्त्र-सरोरुहातें ।
श्रीराम, आणि खुण दाखवि हो स्व-हातें ॥ ६९ ॥
कीं सांग गुप्त अवतार-चरित्र याला ।
जें तारितें चहुं युगांत जगत्त्रयाला ॥
बोले वसिष्ठ मग सन्निध जाउनीयां ।
कां प्राण टाकिसि म्हणे समजावुनीयां ॥ ७० ॥

हा राम मारील दशाननासी । यालागिं जातो प्रभु काननासी ॥
नको निवारूं भरता तयाला । ब्रह्मादिकांच्या पद-दातयाला ॥ ७१ ॥

येणार मागुति चतुर्दश वत्सरांतीं ।
राहो वनांत तितुके दिन आणि राती ॥
आत्माच तो तुज वियोग तयासि नाहीं ।
येऊनि हे करिल जे तव कामनाही ॥ ७२ ॥

\+ \+ \+

देखोनियां गमन निग्रह राघवाचा ।
बोले उभा भरत निश्चय-रूप वाचा ।
वर्षें चतुर्दशवरीच धरीन देहा ।
त्यानंतर त्यजिन यास निरोप दे हा ॥ ७४ ॥

\+ \+ \+

वर्षें चतुर्दशहि रक्षिन शासनातें ।
अंगीकरीन न बसेन नृपासनातें ॥

सिंहासनावरि तुझ्या पद-पादुका मी
पूजीन तों तव पदांबुज-लाभ-कामी ॥ ७६ ॥

—भरतभाव—**वामनपंडित**

## (१०)

### पद. ९७ वें

( चाल -- भाग्यवती ही कविला )

वर्णन करूं केविं तया राम राजयाचे ॥
श्रमुनि शारदाहि करीं घेई विणा स्मरण करित बैसे ॥ धृ० ॥

वैधव्य न येई कुणा । हानि न कवणाची ॥
नाममात्र तस्कर हें । वाङ्मयीं विराजे ॥ १ ॥

अपमृत्यु न कवणाचा । भयहि नच कुणाला ॥
रोग शोक व्याघ्र सर्प । तेंवि दुर्जनाचें ॥ २ ॥

कलह नसे कोणाचा । सुजल सुफल भूमी ॥
निजकर्मीं रत सकलहि । भाग्य त्या जनांचे ॥ ३ ॥

### पद ९८ वे

( चाल -- चल ऊठ ऊठ आतां )

ही गोड रामकथा गावी सदैव प्रेमें । परि तृप्त अंतरीं व्हा स्वानंद पीयुषानें ।।धृ.।।

सुखवा पुराण पुरुषा । अर्पिल तो प्रसाद ॥
यश, बुद्धि, तेज वाढो । नांदा सदा सुखानें ॥ १ ॥

कल्याण नित्य होवो । श्रवणासि रंग येवो ॥
तें दुरित दूर जावो । सुखदाई रामनामें ॥ २ ॥

राम—गीत—सुधा, युद्धकांड, भाग २ रा—**भारताचार्य कोल्हटकर.**

## ( ११ )

"राम आणि सीता भारतीयांचे आदर्श आहेत. भारतवासी बाल-बालिका, आणि विशेषतः कुमारीगण सीतेची पूजा करीत असतात. सीतेप्रमाणें विशुद्ध, पतिपरायण आणि सहनशील होणें हीच भारतीय नारींची सर्वोच्च आकांक्षा होय. ह्या समस्त चरित्रांचें अनुशीलन करीत असतांना एक गोष्ट सहजच तुमच्या ध्यानांत येईल, आणि ती म्हणजे पाश्चात्य आदर्श आणि भारतीय आदर्श यांमधील अंतर. समग्र भारतापुढे सीता जणु सहिष्णुतेचा

उच्चतम आदर्श म्हणून विद्यमान आहे. पाश्चात्य देश म्हणतात, " कर्म करा, कर्म करून आपली शक्ति दाखवा. " माणूस अधिकांत अधिक किती जास्त वस्तूंचा अधिकारी होऊं शकतो हें पश्चिमेनें दाखवून दिलें आहे तर माणसाचें कर्मीत कमी किती थोडया वस्तूंनी भागूं शकते-तो किती त्याग करूं शकतो हें भारताने दाखवून दिलें आहे. या दोन्ही आदर्शांतून दोन निरनिराळ्या भावांचा चरम उत्कर्ष व्यक्त होत आहे. सीता जणु भारतीय भावांची प्रतिनिधीच होय, जणु मूर्तिमती भारतमाताच होय. सीता खरोखरच अस्तित्वांत होती किंवा नव्हती, सीतेच्या कथानकाला ऐतिहासिक आधार आहे किंवा नाही हा मुळी आमचा प्रश्नच नाही. आम्हांला हे पक्कें माहीत आहे की, सीता-चरित्रातून जो आदर्श पुढे ठेवण्यांत आला आहे तो आजहि भारतात विद्यमान आहे. सीताचरित्राच्या आदर्शाने सर्व भारताला आच्छादित करून टाकलें आहे. नारीमधील ज्या नारीजनोचित भावनांविषयीं आम्ही श्रद्धा, भक्ति आणि आदर बाळगत असतों, त्या सर्व भावांची सीता ही आम्हांला द्योतक वाटते. भारतीय स्त्रिया स्वतःला सहिष्णुतेची मूर्ती, पतिपरायण, विशुद्धस्वभाव जगन्माता सीतेच्या कन्याच समजत असतात. सीतेला इतकीं दुःखें सहन करावीं लागली, परंतु रामचंद्रांविरुद्ध एक देखील कटु शब्द तिच्या तोंडावाटें कधी निघाला नाही. ही सारीं दुःखे सहन करणें आपलें कर्तव्यच होय असें तिला वाटत होतें आणि तदनुसार स्थिरपणें, शांतभावानें तिनें तीं सारीं फुलाप्रमाणें झेलली. अंमळ विचार करून बघा, अग्निशुद्ध सीतेला फिरून अरण्यांत सोडून देण्यांत तिच्यावर केवढा घोर अन्याय झाला होता बरें? परंतु म्हणून तिच्या चित्तांत मात्र यत्किंचितहि कटुता उद्भवली नाही. असली तितिक्षा, आणि सहनशीलताच भारताचें वैशिष्ट्य आहे, भारताचा चिरंतन आदर्श आहे. भगवान बुद्धदेवांची शिकवण आहे, " आघाताबद्दल आघात केल्याने त्या आघाताचा प्रतिकार होत नसतो उलट त्यानें जगांत एका पापाची भर पडते. " भारताचा हा विशिष्ट भाव सीतेमध्यें जन्मतःच विद्यमान होता. अत्याचाराचा बदला घेण्याचा विचारहि कधीं तिच्या अंतःकरणाला शिवला नाही.

" कुणास, ठाऊक या दोन आदर्शांमध्यें कोणता श्रेष्ठ आहे--पश्चिमेची ही वरवर भासणारी शक्ति आणि तेज की पूर्वेची कष्ट सहिष्णुता तितिक्षा आणि धृति ? "

महापुरुषांच्या जीवनकथा—**स्वामी विवेकानंद**

(१२)

" रामायण या शीर्षकानेच महाकवि वाल्मीकींना काय सूचित करावयाचे होते हे स्पष्ट होते. रामायण या शब्दांत दोन शब्दांचा संधि आहे ( राम + आयन ). समाजांतील व्यक्तींनी रामचरित्र वाचून किंवा ऐकून रामाचे अंगी स्पष्ट झालेले गुण आपल्या अंगी बाणावे व त्या गुणांचा उपयोग समाजहितासाठी करावा याचाच बोध रामायणात आहे. हे खरे कीं श्रीरामाचे अंगी श्रीमद्‌भगवद्गीतेतील सोळाव्या अध्यायांत वर्णिलेले दैवी गुण विपुलतेने, एक समयावच्छेदेकरून व प्रकर्षाने होते म्हणूनच ते एक दिव्य मानव होते हे सयुक्तिक आहे. हा आविष्कारच समाजाला उपकारक ठरेल.

" पण मध्यंतरीच्या काळात प्रचार व प्रचाराच्या उच्च हेतूने प्रेरित होऊन प्रक्षिप्त केलेल्या भागामुळे श्रीराम हे देवाचे अवतार मानले जाऊ लागले. याचा जनसाधारणाचे मनावर विपरीत परिणाम घडला व समाज कमकुवत बनत गेला. प्रारंभी इतिहासकाळातील अनेक स्वाऱ्यांतून आलेले लोक आपण आपल्यात सामावून घेऊ शकलो. परंतु समाजातील सद्‌गुणी लोकांची शक्ति ही समाज व राष्ट्र-हिताला सांभाळण्यास समर्थ ठरली नाही. देवालयांचे व राज्यांचे संरक्षणाचा भार देवावर टाकण्याच्या निरर्थक व निष्क्रिय वृत्तीचा परिणाम होता तो. हे न्यूनच भारताच्या दीर्घ पारतंत्र्याला कारणीभूत झाले.

" आज स्वतंत्र भारताला ही वृत्ति उपयोगी पडणारी नाही. म्हणून श्रीराम, श्रीकृष्ण हे दिव्यगुणांनी युक्त मानव होते व त्यांचे चरित्रांच्या अभ्यासाने व आपल्या प्रयत्नाने ते गुण संपादून, वाढवून त्यांचा उपयोग देशकल्याण व देशाचे रक्षण यासाठी करतां येईल. श्रीरामचरित्र आपणांस हे स्पष्ट शिकविते कीं नुसता सदगुणांचा परिपोष करून भागत नाही तर त्या सद्‌गुणी माणसांच्या समूहामागे शक्तीची व युक्तीची जरूरी आहे. हीच गोष्ट छत्रपति शिवाजी महाराजांनी हेरली, आचरली व आपल्या दऱ्याखोऱ्यांत रहाणाऱ्या मावळे सवंगडयांत पेरून स्वराज्याचा वृक्ष उभा केला. आज स्वतंत्र भारतास याच त्यागी, सदाचरणी व सशक्त समाजची नितांत जरूरी आहे. ते जमले तरच आपले तत्वज्ञान जगाचे गळी उतरवून जगात चिर-शांतता सुख व समाधान निर्माण करता येईल. तेव्हा मानवी दृष्टीनेही हे आवश्यक आहे.

—एक दिव्य मानव-ले. श्री. र. वि. लिमये,

पुरुषार्थ मार्च १९७१ मध्ये प्रसिद्ध झालेल्या लेखातील उतारा

# श्रीसाईस्तवराज अध्याय

## ( ओवीबध्द )

कवि - **शाहीर खाडिलकर**, एम्.ए, बी.टी.

जय जय श्रीसाईनाथा । आधीं चरणीं ठेवितो माथा ।
आणि गातो आपली कथा । करूनि घ्यावी गोड ही ॥ १ ॥
आकाशीचें तारागण । तारे मोजणें अतिकठिण ।
तसें आपले चरित्र गहन । कठीण वाटे वर्णाया ॥ २ ॥
माझी बुद्धि असे थोडी । तव गुणकथा असे गाढी ।
तरी मला गाण्याची आवडी । मानुनि घ्यावे हें आतां ॥ ३ ॥
आपला महिमा अपार । जाणेल कोण कसा पामर ।
परी मी आपला किंकर । गोड करोनि हें घ्यावें ॥ ४ ॥
संसार तापाचा डोंगर । रोज लागे चिंता घोर ।
शांति मिळेना क्षणभर । तापलेल्या वाळवंटीं ॥ ५ ॥
चोहीकडे वडवानल । जाळीत सुटला चौफेर ।
आम्हीं सांपडलो पामर । तारी तारी बा आतां. ॥ ६ ॥
दिवे लावणें तेलाविण । कोण करील तुम्हावीण ? ।
दिपले पाहुनी सारेजण । धन्य धन्य बोलती ॥ ७ ॥
देव पहातां दिसेना । ठाव ठिकाणा सापडेना ।
आपणच देव आम्हां दीना । म्हणोनि आलो धांवून ॥ ८ ॥
संतचरित्र अतिगहन । जाणेल आहे असा कोण ?
असेल जो पुण्यवान । तोच जाणेल सर्वथा ॥ ९ ॥

असे सर्वत्र बोलती जन । पण जाणून घेण्या येतो कोण ? ।
तीव्र तळमळ असल्याविण । चरित्र कोणा कळेना ॥ १० ॥

एक तकलुपी फळी बांधली । आणि त्यावर निद्रा केली ।
पण ती कोठे ना भंग पावली । योगी एक करूं जाणे ॥ ११ ॥

अंतराळीं योग्याचें शयन । जगावेगळें त्याचें चिंतन ।
पण जगाचीच चिंता दारुण । लागे त्यांच्या जीवाला ॥ १२ ॥

दीन जनांचा उद्धार । हेंचि त्यांच्या जिवितांचें सार ।
असे महात्मे भूवर । याच कार्या अवतरती ॥ १३ ॥

वेडे दिसती वरवर । जना वाटती अमंगळ ।
पण तें मंगलाचें मंगल । अंतरंग तयांचें ॥ १४ ॥

काम असे तो सकळ जवळ । काम संपल्या पळती दूर ।
लोक विसरती उपकार । होती वैरी जन्माचे ॥ १५ ॥

आप्तेष्ट सारे सखे सोयरे । याच माळेचे मणी सारे ।
परि यांतच गुंतोनि सारे । वावरती या संसारीं ॥ १६ ॥

संसार घडेना त्यांच्यावीण । मासा न राही पाण्यावीण ।
नर विसरती संतसज्जन । म्हणोनि होती अनुतप्त ॥ १७ ॥

हें सारें कळलें आतां । म्हणोनि आलों साईनाथा ।
तुझ्यावीण नाहीं आतां । त्राता जगीं या कोणी ॥ १८ ॥

मनाचे तुकडे झाले हाय । म्हणोनि हा एकचि उपाय ।
तुमचेच धरोनिया पाय । चित्त शुद्ध करावें ॥ १९ ॥

दुसरे कांहीं नको मजला । भार न घालितों तुम्हांला ।
तुमच्याच नांवाचा छंद मला । सतत लागो दयाळा ॥ २० ॥

दिवसामागें दिवस चालला । पण तो व्यर्थचि घालविला ।
हीच खंत लागे मनाला । रात्रंदिन गुरुराया ॥ २१ ॥

मनःशांतीचा एक उपाय । धरावे संतजनांचे पाय ।
त्यानेंच संसार सुसर जाय । दूर दूर पळोनी ॥ २२ ॥

देवाची भेट महाकठीण । संतदर्शन सुलभ जाण ।
जवळ येवोनि संतजन । भेट देती सर्वथा ॥ २३ ॥

देवदर्शना जावें लागतें । परी संतदर्शन घरींच होतें ।
भक्तांसाठीं संत फिरते । दीनोध्दार कराया ॥ २४ ॥

सूर्य परोपकारी फार । परि तो असे अतिप्रखर ।
संत असती सदाच कोमल । शांतवित सर्वांना ॥ २५ ॥

चंद्र असे शांत शीतल । परी राहतो बहुत दूर ।
परी शांतीचें माहेरघर । संत येथेंचि राहती ॥ २६ ॥

अग्नि तेजस्वी अति जाण । परी जवळ जाईल कोण ? ।
परी दाहकत्व सोडून । संत जाळिती भवपाश ॥ २७ ॥

शुद्ध निर्मल जसे मोती । तसे सज्जन सदा असती ।
सद्‌गुणरत्नें बहरती । त्यांच्या हृदयीं अखंड ॥ २८ ॥

आम्हां न कळे वर्तमानकाळ । योगी जाणती त्रिकाळ ॥
म्हणून जनतेची तळमळ । त्यांना अखंड लागली ॥ २९ ॥

एकच मागणें साईचरणा । द्यावे सद्विचार माझ्या मना ।
मग लाभेल शांतपणा । आपोआप जीवाला ॥ ३० ॥

हा साई-अध्याय नित्य पठती । त्यांना लाभेल सद्गती ।
जन्ममरणाच्या यातायाती । खास त्यांच्या चुकतील ॥ ३१ ॥

श्रद्धा ठेवोनियां भावें । रोज पठन याचें करावें ।
मग भवरोगमुक्त व्हावें । सांगे कवी पांडुरंग ॥ ३२५ ॥

समाप्त.

# श्रीसाईंस

कवियत्री सौ. शहाणे

वाटते सर्व गाऱ्हाणी पायाशी तुझिया न्यावी
जरि मनात ठरवुनि येते, येताच तुझ्या पायाशी
मी मीपण माझे हरते ॥ ध्रु ॥

दिसताच समोरी तूरे मी दुःख विसरुनि जाते
ही अशीच किमया तुझीरे म्हणुनीच तुला मी स्मरते
आठवता पाय तुझे मी संकट तरुनी जाते ॥ १॥

वाटते मनोमनी मजला मधमधून शिरडीस जावे
त्या दिनीच येऊनि स्वप्नी तू दर्शन सुखमज द्यावे
स्मरताच तुला साई रे तू पुढे मागुति यावे ॥ २ ॥

का व्यर्थ उगा मी मग रे मनी उदास कारे व्हावे
तुज समान असता त्राता कां दीन मला म्हणवावे
पाठीसी उभा तू असता अन्यत्र व्यर्थ कां जावे ॥ ३ ॥

# भक्तिगीत

कवियत्री–सौ. चंद्रकला गजानन चाचड

( चाल–मालकंस )

सद्‌गुरुनाथा साईनाथा कृपा करसी तूं भगवंता ॥
तूंची अमुचा पालनकर्वा तूंची त्राता प्रभु सकलांचा
जडजीवांच्या उद्धारार्थ, शिर्डीवासी अवतरलास
शिर्डीवासी अवतरूनी तूं, धन्य केले तूं अम्हा मानवांस ॥ १ ॥

चिलीम, तंबाखू आणि कटोरा, येवढाची संसार सारा
अंगामधी कफनी सदरा, फडके शुभ्रते डोईला
घेऊनी हाती भिक्षापात्र, मागती भिक्षा दारोदार ॥ २ ॥

वास्तव्य करिसी तूं मशिदीत, तरटाचा तुकडा बैसावयास
धुनी सदा ती पेटलेली, देई साक्ष ती भगवंताची
ऐकूनी ही तुझी अगाध किर्ती, भक्त येती तुझ्या दर्शनासी
पाहुनी ही तुझी सोज्वल मुर्ति, आनंदाने बहू हर्षति ॥ ३ ॥

किती एकांची सारूनी दुःखे बिमोड केलीसी उदीने ।
नवसासी तूं पावन होशी, म्हणून ही श्रद्धा तुझ्यापाशी ॥ ४ ॥

---

# आरती

कवि–डॉ. कापडी

आनंदे, आनंदे, आनंदे नाचू पंचारती ओवाळू ॥ धृ० ॥
साईचरणी भक्तिभावे सुमने ही उधळू ॥ १ ॥

विश्व स्वधर्मी गोफ गुंफुनी गिरक्या हो घेऊ ॥
साईनाथाच्या टिपऱ्या मारित शिरडीला जाऊ ॥ २ ॥

अद्वैताचा ताल धरूनी आनंदे बागडू ॥
साई आमचा प्रणेता अवनीवर दुडदुडू ॥ ३ ॥

द्वैत रगडूनि जात्याखाली, समानतेचे पीठ हळू ।
साईकृपेने षड्‌रिपुंची कणीक चांगली मळू ॥ ४ ॥

आनंदे, आनंदे, आनंदे गावू पंचारती ओवाळू ॥

# मानून 'प्रभु' प्रभूच गाईल तुझ्या भक्तिचे गीत

कवि—श्री. प्र. द. भिसे

साध मानवा हित आपुले, साध मानवा हीत ।
परदुःखाते उमजून घेऊन, करी रे त्यावरी प्रीत ॥ १ ॥
अंधाची तू काठी आणिक बन रे तू दृष्टी ।
दुवाच देईल आत्मा त्याचा जरी असला कष्टी ॥ २ ॥
भुकेल्यास तूं घास घालुनी करी त्या संतुष्ट ।
पाहुनी सेवा परत्माही होईल रे तुष्ट ॥ ३ ॥
तृषितास तू पाजूनी पाणी, करी त्यासी तृप्त ।
करील प्रभू रे भवसिंधूतून तुजलाही मुक्त ॥ ४ ॥
आळवित जा प्रेम भरे तू गाऊनी प्रभूचे गीत ।
मानून 'प्रभु' तुज प्रभूच गाईल तुझ्या भक्तिचे गीत ॥ ५ ॥


# मांगल्य शिल्प

विवाह, मौंजीबंधन श्रीगणेशोत्सव, श्री सत्यनारायणादि
घरगुती मंगल कार्यास लागणारे सर्वोत्कृष्ट व सुंदर सुवर्णासने, कमानी वगैरे

## सजावटीचे सामान

विद्यूत रोषणाईसहित

## योग्य भाड्यानें मिळेल

तसेंच

**सर्व प्रकारचें पेन्टींग, बॅनर्स, साईन बोर्ड, ब्लॉक डिझाइनची कामें अत्यंत सुबक करून दिली जातात.**

भेटा :—

प्रेमभुवन डि. एल. वैद्य रोड, दादर मुंबई २८.

# श्री साई स्तोत्र

कवि—पद्माकर प्रधान

ब्रह्म विष्णू शंकर त्रैमूर्ती दिगंबर
कलियुगी अवतार घेई देव-साई।
केवळ दर्शने ही जळती पापे घोर
ऐसा हा थोर मानवावतार देव घेई।
निंबवृक्षापाशी बालमूर्ती गोजिरी
श्रीसाईचे रूप घेऊनि प्रकट होई।
तद्नंतर शिरडी-ग्रामी जनतेस
फकिररूपे नित्य दिसती देव-साई।
उच्चनीच जातपात अमीर गरीब
सारे समान देखती देव-साई।
भक्ताकरिता रात्रंदिन तळमळती
आईप्रमाणे चिंता वाहती देव-साई।
भक्तांचा भार वाहती वचनां जागती
वेळी अवेळी धावून येती देव-साई।
भेदभाव परोपकार भक्त-उद्धार
कारणे पहा हा अवतार देव घेई।
कृतांताच्या दाढेतून लिळ्या काढतो
भक्तांची अशी लाज राखतो देव-साई।
ज्याचे मूखी शिव हरी राम दत्त साई
स्वप्नीही त्यासी कलिकाळाचे भय नाही।
गाईल बाबांचे गीत त्याची सदा जीत
त्याचे अंतरात वसतील साईनाथ।
श्रीसाईनाथ जगन्नाथ त्राता विश्वाचा
भुकेला भावाचा भक्तिचा आणि प्रेमाचा।
ॐ नमो गणेश, ब्रह्मा, विष्णू, महेश,
रामकृष्ण हरि विठ्ठल साईच ईश।

ॐ शांतिः शांतिः शांतिः।

# श्रीरामप्रभूंचा साक्षात्कार म्हणजेच रामदर्शन

लेखक – डॉ. रा. य. परांजपे

एका चैत्र शुद्ध नवमीला प्रभुरामरायाचा जन्म झाला. सहस्रावधी वर्षे झाली. आपण जन्मदिन साजरा करून चरित्रश्रवणाने धन्य होत असतो. सर्व-सामान्य जीवाचे विचार या बाबतीत बरेच कोते असतात. राम जन्माला आले. त्यांनी अलौकिक कार्य केले. आणि ते आपल्यातून निघून गेले. राम-रायाचे अलौकिक जन्म आणि अलौकिक कर्म हे जीवांना पावन करणारे आहे. या भावनेपोटी रामाची मंदिरे आणि रामचरित्राचे कथा कीर्तन बहुधा होत असते. हे सर्व उत्तमच आहे, परंतु साधुसंत हे एवढ्याच भावनेच्या भांडवलावर तृप्त होत नाहीत. त्यांनी प्रभुरामचंद्राचे वास्तविक ज्ञान मिळवलेले असते. रामाकडे पहाण्याचा त्यांचा एक अतिविशाल दृष्टिकोण असतो. ती ज्ञानदृष्टी असते किंवा त्यापेक्षाहि अधिक अशी विशुद्ध भक्तिदृष्टी असते. शुद्ध ज्ञानापोटी उत्पन्न झालेली पराकोटीची रामभक्ति संतांच्या हृदयात न सामा-वण्याइतकी भरलेली असते. त्यामुळे त्यांच्या वाणीतून तिच्या सुधाधारा जगाला तृप्त करण्याकरता देवाचा जणू प्रसादच अशा स्वरूपात प्रकट होतात.

संतश्रेष्ठ श्रीएकनाथमहाराज यांनी लिहिलेले भावार्थरामायण हे एक ज्ञान आणि भक्तिरसाने ओथंबलेले रामदर्शन आहे. साध्या साध्या प्रसंगातून-सुद्धा रामरायाचे प्रकट दर्शन घडविण्याची अभ्दुत किमया या रामायणात नाथांनी करून दाखविली आहे. नाथांचे रामायण म्हणजे नुसत्या बाह्यांगाने वर्णन केलेले कथानक नव्हे. पदोपदी परतत्त्वस्पर्श करून देणारा हा परिसमणी आहे. या रामायणाच्या वाचनाने मननाने व चिंतनाने वाचकाचे जीवन आमू-लाग्र बदलल्यावांचून रहाणार नाही. नाथांचा हा शेवटचा ग्रंथ असल्यामुळे, त्यांच्या विचारांचे व अनुभवांचे हे परिपक्व फळ आहे. रामायणातील काही

बहारीच्या प्रसंगांचे वर्णन नाथांनी आपल्या अभंगांतहि व्यक्त केले आहे. ' सीता मंदोदरी संवाद ' अशा स्वरूपात सहा अभंगांत असाच एक प्रसंग नाथांनी विस्तारला आहे.

रामनवमीच्या निमित्ताने रामदर्शनाचा हा भाग प्रिय वाचकांपुढे ठेवावा असे तीव्रतेने वाटू लागले. परंतु नाथांचे ते सहा अभंगच जर येथे जसेच्या तसे दिले तर नेहमी गद्य वाचनात रस घेणारा वाचकवर्ग यात रस घेईल का नाही या शंकेने मी येथे त्या अभंगांचा भावार्थ देण्याचे ठरविले आहे. परंतु यात मनाला व्हावे तसे समाधान होत नाही. त्यांच्या मूळच्या शब्दांतील अर्थगौरव, भावार्थ आणि ओज हे कमी तर होणार नाहीना अशी शंका वाटते. सोन्याच्या दागिन्यावर चांदीचा मुलामा केल्याप्रमाणे हा प्रकार होईल हे जाणून विवरण करतांना मधून मधून नाथांच्या काही काव्यपंक्ति उद्धृत करण्याचे ठरविले आहे.

सीता मंदोदरी संवादांत नाथांनी अनेक गोष्टी साधल्या आहेत. कपटी किंवा दुष्ट जन परमार्थविचारांचा आपल्या स्वार्थासाठी सज्जनांकरवी कसा दुरुपयोग करून घेतात, भोंदू लोक मोठमोठे तत्त्वविचार विकृत अर्थाने घेऊन स्वैराचाराला कसे खाद्य पुरवतात, हे नाथांनी विषयाच्या पूर्वपक्षात दाखविले आहे आणि उत्तरपक्षात याचे संपूर्णपणे खंडण करून खऱ्या शुद्ध अंतःकरणात योग्य बोधाने रामरायाचा कसा साक्षात्कार होतो हे दाखविले आहे. इतरहि अनेक बारकावे सहजच दिसून येतील.

सीता मंदोदरी संवादाची पार्श्वभूमि अशी आहे—

रावणाने सीतेला अशोकवनात ठेवली. तिने आपल्याला वश व्हावे म्हणून अनेक प्रकारे प्रयत्न करून पाहिले. त्याचे सर्व उपाय निष्प्रभ ठरले. त्याला आणखी एक सर्वोत्तम उपाय सुचला. त्याने विचार केला की सीता ही महान पतिव्रता आहे. तिला वश करून घेण्याच्या कामी तिच्याच सारखी पतिव्रता पाहिजे. राजकारणातील हा नियम त्याने पसंत केला व सीतेला वश करण्याची कामगिरी त्याने आपल्या प्रिय आणि पतिव्रता मंदोदरीकडे सोपविली. मंदोदरी सीतेचे मन वळविण्यासाठी अशोक वनात आली.

नाथ म्हणतात की सज्जन हो ! पुढील संवाद निजहित साधून देणारा असल्याने सर्वांगाचे कान करून ऐका-अर्थाच्या गाभाऱ्यात शिरून, जीवात

जीव घालून अर्थ गौरव पहा. एवढे केलेत तर भवविभवाचे बंधन तुटेल. महान सिद्धी प्राप्त होईल.

मंदोदरी सीतेजवळ जाऊन तिला वंदन करून मोठ्या प्रसन्न आणि आनंदित मनाने विचारू लागली.

"हे सीते ! मला तुझेकडून रामाचा अनुभव कसा आहे ते समजून घ्यायचे आहे. तूं ज्या रामाचे ध्यान करतेस तो राम व्यापक आहे का एकदेशी आहे ? तो एखादी व्यक्ति म्हणूनच आहे की तो सर्वत्र भरून उरला आहे ? तो तुझा राम कसा आहे ? जर तो व्यापक असेल तर सगळ्या देहांत तोच आहे आणि सगळ्या देहांत जर तो असेल तर तो ओळखण्याची खूण काय ? तो व्यापक नसून परिच्छिन्न म्हणजे व्यक्ति असेल तर ज्ञाते लोक राम व्यापक आहे म्हणतात हे तुला मान्य नाही असे होईल. तुझ्या रामाला आत्माराम म्हणता येणार नाहीं. परंतु तुझा राम जर—

जरी त्यातें व्यापक म्हणसी । तरी तो सर्वभूतनिवासी ॥
तेथें उपेक्षितां रावणासी । अद्वैत भजनासी अभाव ॥ "

वरील प्रश्न उत्पन्न करून मंदोदरीने एक कपटजाल उभे केले आहे. सीता ही रामाला एकदेशी म्हणजे एकादी व्यक्ति अशा स्वरूपातच मानणार नाही याची तिला खात्री होती. आणि तिने राम एकदा व्यापक मानला की तिला अडचणीत टाकणे सोपे होईल असा हा डाव मंदादरीने टाकला. यावर सीतेने तत्काळ उत्तर दिले. सीता म्हणाली "राम हा परमात्मा असून तो सर्वगत व्यापक आहे." झाले ! मंदोदरीला पाहिजे होता तो आधार मिळाला.

ती म्हणते—

"ब्रह्मा धरूनि मुंगीवरी । राम व्यापक चराचरीं ॥
तो रावणाचे शरीरीं । इंद्रिय व्यापारीं नांदत ॥

तुझा राम जर व्यापक आहे म्हणतेस तर तो मुंगीपासून अगदीं थेट ब्रह्मदेवापर्यंत सर्वांच्या देहांत सारखाच आहे. मग रावणाच्या शरीरात तरी तुझा तोच राम नाही काय ? रावणाच्या सर्व शरीरांत इंद्रियव्यापारातहि रामच भरला आहे. मग तूं रावणाला नकार काय म्हणून देतेस ?

रामानुसंधान रावणीं । भजतां होय कोण हानी ? ॥
हें सांगावें साजणीं । प्रीति करूनि मजलागीं ॥"

मंदोदरीची ही डावपेंचाची भाषा ऐकून सीतेला हंसू आले. मंदोदरीचे बुद्धिचापल्य चांगले परंतु खऱ्या बोधाचा अभाव आहे हे ध्यानी घेऊन सीतेने मोठ्या कुशलतेने उत्तर दिले. ते उत्तर ऐकून मंदोदरीला परम समाधान प्राप्त झाले. नाथ म्हणतात त्या उत्तराने वाचकांचेहि कल्याण होईल. देहभाव नाहीसा होऊन आत्मारामाची सोय सांपडेल.

**मंदोदरीच्या प्रश्नाला सीतेचे उत्तर—**

"मंदोदरी, साजणी मी काय सांगते ते नीट ऐक. रामाचे अनुसंधान धरू गेले म्हणजे अनुसंधान धरणारे चित्त रामरूपच होऊन जाते.

मन रामीं रंगलें । अवघे रामचि झाले ॥
चित्तचि हारपलें । माझें चैतन्य झालें ॥

अशा प्रकारे चित्त मन रामरूप होऊन जाते. पहाणारा वेगळा व पहाण्याची वस्तू वेगळी असे द्वैत असेल तर पहाणाराला ते दृश्य पाहता येईल. परंतु राम हा तसा नाही. राम हा व्यापक आहे. परंतु तो एवढा व्यापक आहे की त्याला व्यापण्याकरिता व्याप्य असे काहीच नाही. व्याप्य, व्यापक आणि व्यापणे या त्रिपुटीचा तेथे अभाव आहे. म्हणतेस राम सर्वांच्या अंतर्यामी आहे व तो रावणाच्या शरिरांतहि आहे म्हणून तूं रावणाचे ठिकाणी रामाचे अनुसंधान ठेव.

असे पहा, सर्वांच्या हृदयांत जो अंतरात्मा आहे तो रामच आहे. हे खरेच परंतु त्याचे अनुसंधान धरल्यावर :—

राम सर्वांच्या हृदयीं आहे । धरितां त्या हृदयस्थाची सोये ॥
तेथे राम रावणु कोठें आहे । सांग माये यथार्थ ॥

रामदर्शन हे आपल्या हृदयस्थाचेच दर्शन आहे. त्यांचा भोग घेऊ गेले की भोग घेणारी सीता रहातच नाहीं. ती रामरूपच होते. मग तेथे रावण कुठे आणणार? आणि त्या रावणाच्या ठिकाणी रामाचे अनुसंधान ठेवून त्याच्या भोग कोण घेणार ?

अशा रामदर्शनाचा सोहळा सोडून दृश्य म्हणून पाहू लागले की त्रिपुटी उत्पन्न होते आणि खरे रामरूप दिसेनासे होते. रावणाला पाहून रामदर्शन कसे होईल ? रावण रामरूप दिसत नाही तर रामच रामरूप दिसतो. तेथे हे रावणाचे पिसे काय होय ? "

सीतेच्या उत्तराचा भावार्थ गूढ आहे. अनुसंधान याचा खरा अर्थ सीतेनें स्पष्ट करून सांगितला आहे. ज्या अनुसंधानात अनुसंधान ठेवणारा वेगळा उरत नाही तेच खरे अनुसंधान. अनुसंधान करणारा आपल्याहून दुसऱ्या गोष्टीचे अनुसंधान ठेवील तर त्रिपुटी निर्माण होते. परंतु स्वतःचेच अनुसंधान म्हणजे आत्मतत्त्वाचे अनुसंधान ठेवू गेला म्हणजे तेथे अनुसंधान संपते, त्रिपुटी आटते व ज्या आत्मतत्त्वाचा साक्षात्कार होतो तेच रामाचे स्वरूप होय. अशा प्रकारच्या रामदर्शनाने सीता ही रामरूपच होती. परंतु व्यवहारात ती रामाची पत्नी एक पतिव्रताच होती. ज्ञात्याचा व्यवहार हा व्यवहाराच्या योग्य मर्यादा संभाळूनच होत असतो हा यातील गूढ भाग आहे.

सीतेच्या वचनमात्रे मंदोदरीस पूर्णावस्था प्राप्त झाली. सीतेने खरे रामदर्शन कसे होते हे समजाऊन सांगितल्यामुळे व मंदोदरी ही श्रवणसुखचतुर असल्यामुळे तिला तत्काळ रामदर्शन झाले व ती कृतार्थ झाली. सीता ही तिला रामदर्शन देणारी सद्गुरु झाली. सद्गुरुकृपेनेच खरे रामदर्शन होते असे नाथांनी या प्रसंगाने स्वच्छ सांगून टाकले आहे.

मंदोदरीची काय अवस्था झाली ते नाथांच्या संपूर्ण अभंगांत पहा—

ऐकोनि सीतेच्या उत्तरीं । पूर्णावस्था मंदोदरी ॥
चढला स्वेदकंप शरीरी । आनंद लहरी दाटलो ॥ १ ॥

इंद्रिया विकळता आली । चित्त चैतन्या मिठी पडली ॥
अंतरीं सुखोर्मी दाटली । तेणें पडली मूर्च्छित ॥ २ ॥

बाप सद्‌गुरूचें सामर्थ्य । अलौलिक अति अद्‌भूत ॥
वचनमात्रें शक्तिपात । जाला निश्चित मंदोदरी ॥ ३ ॥

नाहीं हस्त मलक । कृपा कवळोनि देख ॥
वचनमात्रें दिले सुख । एका जनार्दनी सरेना ॥ ४ ॥

मंदोदरीच्या कपट प्रश्नाला सीतेने जे तात्त्विक उत्तर दिले ते सीतेच्या प्रभावी सामर्थ्यामुळे मंदोदरीच्या हृदयात घुसले. ती अक्षरे नव्हती, तर ती आनंदसाम्राज्यदीपिकाच होती किंवा आत्मदर्शन करून देणारी चित्कलिका होती. मंदोदरीच्या अंतःकरणातील अज्ञानरूपी अंधकार दूर झाला, ज्ञानाची दिवाळी उजळली, हृदयात हर्षलतांची लावणी होऊ लागली. अष्टसात्त्विक भाव दाटून आले आणि मंदोदरी त्यात हरवली आणि रामरूपच झाली. सीतेने मंदोदरीच्या मस्तकावर वरदहस्त न ठेवताहि केवळ वचनमात्राने मंदोदरीस साक्षात्कार झाला. सद्गुरूचे सामर्थ्य हे असे आहे. ज्या शक्तिपाताबरोबर साक्षात्कार होत नाही तो खरा शक्तिपात नव्हे हे या प्रसंगाने नाथांनी स्पष्ट केले आहे. इतर शक्तिपाताचे प्रकार गुरुगम्य मार्गात आहेत ते कसे गौण आहेत ते येथे स्पष्ट ध्यानी येईल.

साधुसंतांनी असेच रामदर्शन घेतलेले आहे. आध्यात्मिक पार्श्वभूमीवर रामचरित्राची अपूर्व गोडी त्यांनी घेतली व आपणहि घ्यावी याच उद्देशाने नाथांनी भावार्थरामायणासारखा ग्रंथ निर्माण केला.

# श्रीरामनाममहात्म्य

ले. डॉ. के. भ. गव्हाणकर.

नराचा नारायण होणे हा मनुष्याचा अधिकार आहे, त्याचा तो स्वधर्म आहे. त्याचे ते परमोच्च ध्येय आहे, नव्हे त्याचा तो जन्मसिद्ध हक्क आहे. हा अधिकार जो ओळखत नाही, जो स्वधर्म आचरीत नाही तो लौकिकात कितीही विद्वान, श्रीमंत, शूर, मुत्सद्दी अथवा श्रेष्ठ राजाधिकारी असला तरी त्याला किंमत नाही, तो नरपशूच होय.

जिव्हाळयाने उच्चारलेल्या नामात आत्म्याची विद्युत (कुंडलिनी) जागृत करण्याची अगाध शक्ति असते व तिच्यामुळे मनुष्याला देवपण प्राप्त होते.

हरेर्नाम हरेर्नाम हरेर्नामैव केवलम् ।
कलौ नास्त्येव नास्त्येव नास्त्येव गतिरन्यथा ॥

संसारसर्पदंष्टानामेकमेव सुभेषजम् ।
सर्वदा सर्वकालेषु सर्वत्र हरिचिन्तनम् ॥

सत्ययुगात ध्यान, त्रेतायुगात यज्ञ, द्वापारामध्ये पूजा अर्चा व कलियुगात केवळ केशवकीर्तनच सर्वश्रेष्ठ सांगितले आहे. जे फल अन्य युगांमध्ये त्या त्या साधनांनी प्राप्त होते तेच कलिमध्ये भगवन्नामस्मरणाने मिळते.

कृते यद्ध्यायतो विष्णुं त्रेतायां यजतो मखैः ।
द्वापारे परिचार्यायां कलौ तद्धरिकीर्तनम् ॥

नाम तर सर्वांना सर्व अवस्थांमध्ये कल्याणकारी आहे. तरीपण त्यात दहा मोठे दोष आहेत. (१) सत्पुरुषाची निंदा (२) भगवन्नामात भेद-

भाव (३) गुरूचा अपमान (४) शास्त्रनिंदा (५) भगवन्नामात अर्थवाद (६) नामाच्या आश्रयाने पापकर्मास प्रवृत्त होणे (७) धर्म, व्रत, जप आदि बरोबर भगवान्नामाची तुलना करणे (८) भगवन्नाम ज्यास ऐकण्याची इच्छा नाही त्यास त्याचा उपदेश करणे (९) नाममहात्म्य श्रवण करून नामात प्रेम उत्पन्न न होणे व (१०) अहंता--ममता व विषयभोगातच गर्क राहणे.

श्री गौरांगप्रभु म्हणतात "ह्या कलिकाळात कर्मकान्डाचे आचारण सांगोपांग होणे दुस्साध्य आहे. अन्य युगाप्रमाणे या युगात द्रव्य-शुद्धि, शरीरशुद्धि, होऊ शकत नाही म्हणून या युगात तर एकमात्र भगवन्नामच आधारभूत आहे.

एकाक्षरी ब्रह्म पण ह्याचा उच्चार-नादब्रह्म-करतां येत नाही. श्रीराम म्हणजेच ॐ कार व हे नाम सर्वांना सुलभतेने म्हणता येते. या कारणास्तव श्री सद्‌गुरू साईबाबांनी शिरडीत श्री रामनवमी उत्सवाचा पायंडा घातला. श्री बाबांचा 'श्रीराम जयराम जयजयराम' हा मंत्र होता असे मला समजते.

'रामकृष्णहरी' हा भागवत धर्मातील तारकमंत्र अबालवृद्धाच्या तोंडी आहे. यांत एकाच जगन्नियंत्याची तीन नावे आहेत. 'राम' नामात रमविण्याचे सामर्थ्य आहे. हृदयामध्ये रमविणारा जो प्रभु आहे त्याची आठवण करून हृदय रमविणारा हा मंत्र आहे. 'तैसा हृदयी आंतु मीं धर्सु । असतां सर्व सुखांचा आरामु । किं भ्रांतांसि कामु । विषयावरि ॥ ५९ ॥ ज्ञा.९. सर्व सुखांचा आराम राम प्रत्येकाच्या हृदयात आहे. प्रत्येक कर्म करण्यापूर्वी कर्माकडे ओढून नेणारी व कर्म होत असता सुखवणारी जी गोडी असते तिचे नाव 'कृष्ण' होय. सर्व गोडी जेथून उगम पावते व कर्मानंतर जेथे लुप्त असते त्या ऐक्यसुखाला "हरि" हे नाव आहे. सर्व कल्पनांचे, कर्मांचे हरण या ऐक्यात आहे. कर्मापूर्वी हृदयात रमणारे कर्मात व्यक्त होणारे व परत ऐक्यात जाणारे जे प्रभुचे सुख आहे त्याची आठवण व जागृति या 'रामकृष्णहरि' या नामाने होते. ज्याप्रमाणे 'साखर' या नावाने जिभेतील साखरेची आठवण जागी होती, त्याचप्रमाणे आपल्या अंगी असलेल्या प्रभुसुखाची जाग या 'रामकृष्णहरि' या नाम मंत्राने होते. साखर बाहेरून जिभेवर ठेवावी लागते. प्रभुसुख अंगीच असल्यामुळे केवळ स्मरणाबरोबर ते

भेटू लागते. मुलाच्या स्मरणाबरोबर मुलाचा कळवळा व त्या कळवळ्याचे सुख आईला भेटते, तसे प्रभूचे सुख या नामस्मरणाबरोबर भेटू लागते.

ब्रह्मीभूत पुनीत महाराज यांची समाधी नर्मदाकांठी कोरल गांवी आहे. अहमदाबादेजवळील एका गांवी अत्यंत गरीब कुटुंबात यांचा जन्म झाला. लहापणीच वडील निधन पावले. आई मोलमजुरी करून दोघांचे कसेबसे पोट भरीत होती. मुलगा शाळेत जाई. जवळ पुस्तके नसावयाची. फाटके तुटके कपडे, हजामत न केल्याने केस वाढलेले असायचे. मुले हसत. एकदा आईजळ त्याने केस कापण्यासाठी दोन आणे मागितले. तेवढेही बिचारी देऊ शकली नाही. पुढे पुस्तकाच्या अभावी शाळाच सोडावी लागली.

हे १२-१३ वर्षाचे असतांनाच त्यांना क्षय झाला. औषधोपचारासाठी पैसा नसल्यामुळे आईने मुलाला सरकारी दवाखान्यात पाठविले. डॉक्टरांनी तपासून सांगितले की रोग फार वाढलेला आहे औषधांचा कांहीएक उपयोग नाही. बिचाऱ्या मुलाच्या मनाला काय वाटले असेल? मुलगा दवाखान्याच्या बाहेर पडला. त्याचे मनात विचार आला की अशा स्थितीत आईला त्रास द्यायला घरी तरी कशाला जायचे? मृत्यु तर जवळ आला आहे. येऊ दे त्याला यायचे असेल तेव्हा. असे म्हणून हा मुलगा वाट फुटेल तिकडे निघाला. जाता जाता एक फकीर त्याला भेटला. त्याने मोठया प्रेमाने त्याची विचारपूस केला. मुलाकडून सर्व हकीकत समजताच फकीर म्हणाला, "या रोगावर माझ्या जवळ एक दिव्य औषध आहे. पण ते तूं नित्यनेमाने श्रद्धापूर्वक घेणार असशील तर सांगतो." मुलगा उद्गारला, "सांगा, मी ते अगदी नित्यनेमाने व श्रद्धेने घेईन." त्यावर तो फकीर म्हणाला "तुला बरे वाटेपर्यंत सबुरीने एकसारखे घेता येईल तितके रामनाम घेत रहा. तूं खात्रीने बरा होशील." असे म्हणून त्याने त्यास एका कागदाच्या चिटोऱ्यावर "श्रीराम" लिहून दिले.

मुख्य प्रश्न आहे तो नितांत श्रद्धेचा आणि ती त्याच्यापाशी होती. रामायणकाळी निवळ रामनामाने दगड तरले मग हा मुलगा कां नाही संसारसागर तरून जाणार? त्याला औषध मिळाले. जवळ जवळ सव्वा वर्ष तो त्याचे अखंड सेवन करीत राहिला आणि मुलाचा त्यावेळी असाध्य असलेला रोग पूर्ण-

पणे नाहीसा झाला. कोठल्या कोठे पळाला. पुढे तो आपल्या गावी परतला व दवाखान्यातील डॉक्टरला भेटला. त्याने मुलाला प्रथम ओळखलेच नाही. ओळख पटवून देताच डॉक्टरने आश्चर्यातिरेकाने विचारले "बाबा तुला कोण असा धन्वंतरी भेटला ?" मुलाने घडलेली हकीकत सांगितली.

आता उपजीविकेचे काही साधन हवे म्हणून त्याने सौराष्ट्रात एका व्यापाऱ्याकडे नोकरी धरली. रामनामजप चालूच होता. संसारात मन लागेना. वैराग्यवृत्ति बळावत चालली. अखेरीस व्यापारी नको नको म्हणत असताही नोकरी सोडून निघाला तो 'कोरल' गांवी येऊन राहिला. मंदिरात बसावे, भजन पूजन करावे, रामनामाचा जप करावा, भजने लिहावी, असा क्रम सुरू झाला. त्याची वैराग्यशीलता व रामभक्ति पाहून हळू हळू त्याच्या भोंवती भक्तगण जमू लागले, रामनामाच्या महिम्याने बालवयात क्षयरोगाने पछाड-लेला मुलगा आता 'पुनीत' महाराज नांवाने लोकांत ओळखला जाऊ लागला. 'पुनीत' महाराज नंतर शहरात जाऊन सामुदायिकरीत्या भागवतसप्ताह, रामनामजप, रामधून इ. कार्यक्रम करू लागले. मोठमोठे रसिक व्यापारी व वाणी त्यांच्या भजनी लागले. ते पाच वर्षापूर्वी ब्रह्मीभूत झाले.

रामनामाने शीला तरल्या पण श्रीरामाने स्वतः टाकलेले दगड मात्र बुडाले. याचे कारण व्यक्तिला महत्त्व नाही तर 'रामनाम' या नामाला महत्त्व आहे.

शेवटी ज्या दयाघन प्रभूने आपली अगाध लीला माझेकरवी लिहून घेतली त्या सच्चिदानंद सद्गुरू साईबाबांच्या चरणी माझी पूर्ण शरणांगती. कारण जो फकीर म्हणून वर उल्लेख आला आहे तो दुसरा कोणी नसून शिरडीचा फकीर आहे.

* * *

# रामायण-एकात्मता

लेखक- द. शं. टिपणीस

रामायण व महाभारत हे हिंदूंचे आवडते ग्रंथ. ती महाकाव्ये आहेत. महाभारत हा जसा तत्त्वज्ञानाचा ग्रंथ आहे तसाच तो एक व्यावहारिक ज्ञान-कोष आहे. या संसारात व्यक्तिव्यक्तींच्या व्यवहारांत जे संघर्ष येतात त्यांचे शास्त्रोक्त विवेचन करणारा तो ग्रंथ आहे. त्यांत राजकारण व मुत्सद्देगिरी आहे. महाभारत हे एक उत्कृष्ट महाकाव्य असल्यामुळे साहित्यातील सुंदर सुंदर नमुने त्यांत आढळतात. बालमनाला रिझविणाऱ्या रम्य कथा त्यांत आहेत. त्यामुळे महाभारत हा आबालवृद्धांचा अत्यंत आवडता ग्रंथ झाला आहे. समाजातील सर्व स्तरांतील लोक त्याचा आस्वाद घेऊ शकतात. रामायण हा महाभारताइतकाच हिंदूंचा आवडता ग्रंथ आहे. रामायणात उच्चपातळीवरील जीवनातील अनेक आदर्शांचा आविष्कार केलेला आहे. राम हा हिंदूंचा एक ईश्वरी अवतार वाटत असला तरी खुद्द राम स्वतःला तसे न समजता एक मानवी राजपुत्र व राजा मानतो व या नात्यांनी तो सर्व व्यवहार करतो. साक्षात्कारी अवतारी पुरुष पुढे गीतेत सांगितलेला निष्काम कर्मयोग कसा आचरणात आणतो याचे प्रात्यक्षिक म्हणजे रामचरित्र होय. आधी प्रात्यक्षिक मग त्याचे स्पष्टीकरण करणारे तत्त्वज्ञान अशा शास्त्रीय पद्धतीचा संबंध रामायण व महाभारत यांच्यात आहे. ज्यात जीवनातील गुण प्रकर्षाने प्रकट झाले आहेत असे जीवनदर्शन रामयणात घडते. गुणच नव्हे तर गुणांच्या सहाय्याने अवगुणही मानवी जीवनात उत्कटतेने प्रकट झालेले आपणांस रामायणात पहावयास मिळतात. आजवर ऐकत आलो अशा पतिभक्ति, बंधुभावनिष्ठा वगैरे भावनांचे दर्शन जसे रामयणात घडते तसेच

जिच्या मायावी सौंदर्यामुळे मी मी म्हणणारे पराक्रमी पुरुष आत्मनाश करून घेतात अशा आदिमायेचे दर्शनही आपणांस रामयणात होते. जेथे तिचा स्पर्शही होणार नाही इतक्या अंतरावर या आदिमायेस ठेवली व जगन्माता म्हणून आईच्या प्रेमाने तिची सेवा केली तर उत्कट भक्ति व निष्ठा उत्पन्न होऊन 'रामाची' प्राप्ती होते हे मारुतीच्या जीवनात दिसते. मुक्ताबाईची मुंगी आकाशी उडाली व तिने गिळिले सूर्याशी. रामायणांतील बाल-मारुतीनेही सूर्याकडे झेंप घेतली खरी पण सूर्याला गिळता येण्याऐवजी त्यास मुखप्रहार घ्यावा लागला. कारण मुक्ताबाईच्या मुंगीतील राम जागृत झाला होता, तर बालमारुतीतील राम जागृत व्हावयाचा होता. कोणत्याही कार्यास वेळ असते. अकाली एखादे कार्य करण्याचा प्रयत्न केल्यास पदरी अपयश येते. पाडास न आलेले आंबे पिकत घातले व ते नासले तर त्यात काही नवल नाही. हा जीवनाचा धडा मारुतीची जन्मल्याबरोबरची अयशस्वी झालेली झेंप दर्शविते असे म्हणावयास काय हरकत आहे ! स्त्रीने किती मर्यादेपर्यंत जावे हे दर्शविणारी लक्ष्मणरेषा रामायणात आहे. तीच रेषा जीवनातील प्रत्येक व्यवहारात आहे. या लक्ष्मणरेषेचे ( मर्यादेचे ) उल्लंघन केल्याने पदरी नुकसान आल्याखेरीज रहात नाही, हा धडा आपणास रामायणात मिळतो. पतीने आपल्या स्त्रीच्या चारित्र्याचा संशय घेणे ही आर्य पतिव्रतेला मरणप्राय दुःख देणारी गोष्ट आहे. अशा वेळी आपले चारित्र्य धुतल्या तांदुळासारखे स्वच्छ आहे हे सिद्ध करण्यासाठी ती वाटेल ते दिव्य करण्यास तयार होते हे सीताशुद्धि प्रकरणावरून समजावयास हरकत नाही. रामाला नदीपार करताना आपणांस रामाची सेवा करण्यास मिळाली म्हणून धन्यता मानणारे नावाडी, लहान सहान खडे व काटक्या टाकून रामाच्या कार्याला मदत करावयास मिळाली म्हणून आनंदणारी खार 'प्रेमानें केलेली लहानशीही सेवा मला प्रिय आहे' असे उद्गारणारा राम या गोष्टी पाहून असे वाटते की प्रेमभक्ती देवाला अधिक श्रेष्ठ वाटत असावी व पुढे शबरीच्या उष्ट्या बोरांनी ही गोष्ट स्पष्ट केली आहे. रामायणातील धोबी हा धोबी म्हणून न समजता जनतेचे एक मुख म्हणून समजले तर एक गोष्ट लक्षात येते की त्या काळचे राज्यकर्ते जनतेच्या टीकेची दखल घेत होते. ही टीका उपेक्षेने मारण्याचे राजकारण रामाच्यावेळी जन्मास आलेले नव्हते.

भारतात आजकाळ एकात्मता हा शब्द फार ऐकू येतो. ही एकात्मता भारतीयांना नवीन नाही. फार पुरातन आहे, रामाच्या जीवनात ती पहावयास मिळते एवढेच नव्हे तर या एकात्मतेचा उपयोग सामाजिक व राजकीय कार्य यशस्वी रीत्या साधण्यास करून घेता येतो हे सोहदारण रामाने आपल्या जीवनात दाखवून दिले आहे. एकात्मता म्हणजे सर्वांभूती ईश्वर पहाणे, त्याला साजेसे व्यवहार करणे, वागणूक ठेवणे. हा एकात्मतेचा आध्यात्मिक अर्थ झाला. अशी एकात्मता आपल्या संतांनी साधली होती. तशी ती सर्व-साधारण जनतेला साधणे अशक्य आहे. व्यवहाराच्या दृष्टीने एकात्मतेचा काय अर्थ होतो ? आपण माणूस नावाचे प्राणी आहोत, तसेच घराघरांतून, प्रांताप्रांतांतून, राष्ट्राराष्ट्रांतून सर्व जगभर पसरलेले आपल्याच सारखे कोट्यावधी प्राणी आहेत. या कोट्यावधी माणसांमाणसांतून समान अशा गोष्टी, काही भावना आहेत, हे लक्षांत घेऊन एकमेकांनी एकमेकांची कदर बाळगून वागले पाहिजे याची जाणीव होणे म्हणजे एकात्मता म्हणजे काय हे समजणे होय. आपल्याला जशी भूक तहान आहे तशीच ती मानवांसकट सर्व प्राण्यांना आहे या गोष्टी भागल्या गेल्या नाहीत तर आपणांस जसे कष्ट व यातना होतात तशाच त्या इतरानांही होतात, याची पूर्ण जाणीव ठेवून ती व्यवहारात उतरविणे म्हणजे एकात्मता जोपासणे होय. मानवाला निसर्गाने दिलेल्या मूलभूत हक्कांवर आपल्याप्रमाणे इतर मानवांचाही हक्क आहे हे ओळखून कोणी कोणाच्या या निसर्गदत्त हक्काला बाधा येईल असे काही न करणे म्हणजे एकात्मता कृतीत आणणे होय. आपण एकाच ईश्वराची लेकरे आहोत, एकाच माळेतील मणी आहोत, एकाच घराण्यातील आहोत हे लक्षात घेऊन एकमेकाशी ममतेने वागणे व घराण्याचे ब्रीद जे आनंद तो आपल्या वागणूकीने सगळीकडे पसरविणे व होईल तेवढे आपल्या भावा-बहिणींचे कल्याण करणे म्हणजे एकात्मता पाळणे होय.

एकात्मता ही भावनिक असल्यामुळे प्रथम ती मनात व वृत्तीत निर्माण झाली पाहिजे. एकात्मता त्यागावर उभारलेली आहे. त्यागाशिवाय प्रेम नाही व प्रेमाशिवाय एकात्मता नाही. त्याग व प्रेम यांना स्वार्थाचा स्पर्शही चालत नाही. असला तर ते खरे नाणे नव्हे. यास्तव एकात्मता तोच साधू शकतो की ज्याची वृत्ति प्रेमी व त्यागी असते. अशी वृत्ति अध्यात्माने मिळू

शकते. म्हणून अध्यात्म व व्यवहार यांचा मिलाफ योग्य प्रमाणात झाला पाहिजे व तसा तो झालेला आपणांस रामायणात रामचरित्रात पहावयास मिळतो.

राम व मारुती यांची एकात्मता अध्यात्माच्या उच्च पातळी-वरील असली तरी ती रोजच्या जीवनक्रमात उतरलेली होती ही गोष्ट राम व मारुती यांच्यांतील अनन्य भक्तिमुळे घडून आलेल्या घटनांवरून दिसून येते. रामासारखा अवतारी मानव व जंगलांत राहणारे वन्यपशू वानर यांच्या मैत्रीत आपणांस एकात्मतेचे दर्शन होते. आपण श्रेष्ठ, ही काय माकडे रानटी असे कधीही रामाच्या मनात आले नाही. माकडे झाली तरी ईश्वराचीच व आपण झालो तरी तरी ईश्वराचेच ही भावना रामाच्या ठिकाणी होती. प्रेम, भक्ति, शौर्य आदि गुण आपल्याप्रमाणे त्यांच्याही ठायी आहेत. त्यांचे हे गुण आपण जोपासले व आपले संरक्षण देऊन त्यांच्या भीती निराशादि भावना घालवून त्याच्यांत आत्मविश्वास उत्पन्न केला तर ही जंगलाच्या कोपऱ्यात पडलेली वानरे जीवनात सुखाची भर टाकतील ही जाणीव रामाच्या ठायी होती. आपण प्रेमाने ममतेने त्यांना आपलेसे केले व त्यांच्या, जीवनाला आवश्यक त्या गोष्टी त्यांना दिल्या तर वानर नर होतील व आपल्या कार्याचा काही वाटा उचलतील हे ओळखून रामाने वानरांशी मैत्रीची वाग-णूक ठेवली व आपल्या कार्याला त्यांची मदत घेऊन ते यशस्वी केले. गोष्ट खरी वा खोटी कशीही असो, खारीसारख्या चिमुकल्या प्राण्याशी रामाने प्रेमळ वागणूक ठेवली व निष्ठेची व प्रेमाची चिमुट देवाघरी गाडाभर मोलाची असते हे दाखवून दिले. व्यवहारांत देणे घेणे असते व जेव्हा घेण्यापेक्षा देणे अधिक होते तेव्हा एकात्मता निर्माण होते. जसे जसे घेणे कमी होईल व देणे वाढत राहील तसतशी एकात्मतता अधिकाधिक निर्माण होईल. राम देत राहीला त्याग करीत राहीला म्हणून मानवांनाच नव्हे तर माकडांनाही तो प्रिय झाला.

# अहल्योद्धार

अहल्योद्धार हे प्रकरण वाल्मीकि रामायण, अध्यात्म रामयण, आनंद रामायण, वेद व महाभारत इत्यादि ग्रथांतून वर्णन केले आहे. त्या प्रत्येक ग्रथांतील कथानक सारांशरूपानें देऊन नंतर त्याचा ऐतिहासिकदृष्टया विचार करूं. प्रथम वाल्मीकि या प्रकरणासंबधानें काय म्हणतात ते पाहू.

श्रीरामचंद्र विश्वमित्राबरोबर गेल्यावर त्यांच्या यज्ञांत विघ्न करणाऱ्या राक्षसांचा संहार करून अयोध्येस परत जाण्याची आज्ञा मागू लागले तेंव्हां या आश्रमांतील सर्व ऋषि म्हणालेः

"मैथिलस्य नरश्रेष्ठ जनकस्य भविष्यति यज्ञः।
परमधर्मिष्ठस्तस्य यास्यामहे वयम् ॥ ६ ॥
त्वं चैव नरशार्दूल सहास्माभिर्गमिष्यसि ।
अद्भूतं च धनूरत्नं तत्र त्वं द्रष्टुमर्हसि ॥ ७ ॥( वा.रा. १।३१ )

असें सांगून ते सर्व ऋषि निघाले. व त्यांच्याबरोबर श्रीरामही निघाले. मार्गांत त्यांना गंगा ( भागीरथी ) नदी लागली. त्या वेळेस श्रीरामानें गंगोत्पत्ती-बद्दल प्रश्न केला व विश्वमित्रानें ती सांगितली असें लिहीलें आहे. *रात्री त्या नदीवर मुकाम केल्यावर दुसरे दिवशीं ते सर्व गंगानदी उतरून पलीकडे गेले. तेंव्हां मार्गांत त्यांना विशाला नगरी लागली. त्या नगरीची माहिती करून दिल्यावर विश्वमित्र पुढें चालले. तों त्यांना मिथिला नगरीच्या जवळ असलेला गौतमाचा आश्रम दिसला. हा आश्रम मिथिला नगरीच्या जवळ असलेल्या बगीच्यांत होता असे

*हें प्रकरण प्रक्षिप्त आहे. गंगावतरण पाहा.

"मिथिलोपवने तत्र आश्रमं पश्य राघवः !" ( वा. रा. १।४८,११) ह्या वचनावरून समजतें. तो आश्रम पाहून श्रीरामानें त्याची माहिती विचारली व विश्वमित्रांनीं ती सांगितली. नंतर रामलक्ष्मणांनीं आश्रमांत जाऊन तपश्चर्या करीत असलेल्या दिव्यदेहधारी अहल्येला नमस्कार केला व तिनेंही निष्कामबुद्धीनें श्रीरामाचा सत्कार केला. × नंतर जिनें एक वेळ दुराचरण केलें, पण त्याच्या निरसनार्थ पतीची आज्ञा पाळून कडक तपश्चर्या केली व जी त्या तपश्चर्येनें शुद्ध झाली व सौंदर्यवान श्रीरामास पाहूनही जिची मति चंचल झाली नाहीं ती खरोखर पवित्र आहे असें मानून श्रीरामांनीं तिच्या आतिथ्याचा स्वीकार केला. अर्थात श्रीरामांनीं तिचा उद्धार +केला. हें समजतां गौतम आले व त्यांनीं श्रीरामाला मेजवानी करून अहल्येचा स्वीकार केला. व नंतर रामलक्ष्मण विश्वामित्रासह मिथिला नगरीकडे निघून गेले.

---

× गौतमाचा वेष घेऊन इंद्र आला हें जाणून अहल्या त्याच्यावर आसक्त झाली व त्याच्याशीं ती रममाण झाली. हें जाणून गौतम अहल्येस म्हणाला, यदा ह्येतद्वनं घोरं रामो दशरथात्मजः । आगमिष्यति दुर्धर्षस्तदा पूता भविष्यसि ॥ ३१ ॥ तस्यातिथ्येन दुर्वृत्ते लोभमोहविवर्जिता । मत्सकाशं मुदा युक्ता स्ववपुर्धार यिष्यसि ॥ ३२ ॥

+भारतवर्षीय प्राचीन ऐतिहासिक कोशामध्यें ( वा. रा. बा. कां. स. ४८ व ४९ व उ. कां. स. ३० चा दाखला देऊन ) लिहिलें आहे कीं गौतमानें अहल्येस शिला हो असा शाप दिला व तिनें उःशाप मागितल्यावरून त्यानें दाशरथी रामाच्या पदरजःकणानें पूर्ववत् होशील असा तिला वर दिला. याप्रमाणें हिचा पुढें उद्धार झाला. (भा. व. प्रा. ऐ. कोश पान ३४, अहल्या श. पहा. ) पण हें सपशेल खोटें आहे. बालकांडांत कोशकारानें लिहिलेल्या कथानकाचा पत्ता नाहीं. उलट या कथेवर 'पुराणादिप्रसिद्धशिलारूपप्राप्ति-शापस्तु कल्पांतरेण' अशी टीका आहे. अर्थात् शिला झाल्याची गोष्ट वाल्मीकीत नसून ती इतर पुराणात आहे असें म्हणून

शापदग्धा पुरा भर्त्रा राम शक्रापराधात् ।
अहल्याख्या शिला जज्ञे शतलिंगः कृतस्वराट् ।

हें पद्मपुराणांतील वचन दिलें. ( वा. रा. १-४८-३० वरील टीका पहा. )

ह्याप्रमाणें वाल्मीकींत हकीकत आहे. आतां याच प्रकारासंबंधानें अध्यात्म रामायणकार काय म्हणतात तें पाहा.

श्रीरामचंद्र विश्वमित्रासह मिथिलानगरीस जात असता मार्गांत त्यांना गंगानदी लागली असें अध्यात्मांत लिहिलें. ती नदी तरून जातेसमयीं श्रीराम नावेंत बसत असतां नावाडी म्हणाला,

'क्षालयामि तव पादपंकजं राम नाथ दृषदोः किमंतरम् ॥

मानुषीकरणचूर्णमस्ति ते पादयोरिति कथा प्रतीयसि ॥' (अ. रा. १।६।२)

असें म्हणण्याला आधार काय तर

'दुष्टे त्वं, तिष्ठ दुर्वृत्ते शिलायामाश्रमे मम'

हें त्याच रामायणांतील वचन कोणी कोणी पुढे आणतात. (अ. रा. १।५।२७). पण ह्या वचनांत 'शिला हो' असें लिहिलें नाहीं. माझ्या आश्रमांत दगडावर बसली राहा अथवा जहल्लक्षणेने 'गंगायां घोषः'

---

ह्यावरून अहल्या शिला झाली हें वा. रा. बालकाडांत नाहीं हें सिद्ध झालें. आतां उत्तरकांडात काय आहे तें पहा. इंद्रजितानें इंद्राचा पराभव केल्यावर इंद्र निस्तेज झाला. तेव्हां ब्रह्मदेव त्याला म्हणाला, "पूर्वी त्वां गौतमाच्या स्त्रियेचें पातिव्रत्य भ्रष्ट केलेस त्या वेळेस गौतमानें ज्या अर्थी तूं निःशंकपणें माझ्या पत्नीचा उपभोग घेतलास त्या अर्थी तूं समरांगणामध्ये शत्रूच्या हस्तगत होशील आणि हे दुर्बुद्धे त्वा जें पापकर्म जगतामध्ये प्रवृत्त केलें तें मनुष्यलोकामध्ये सुरू होईल. कारण

यद्यदाचरति श्रेष्ठ स्तत्तदेवेतरो जनः ।

स यत्प्रमाणं कुरुते लोकस्तदनुवर्तते ॥

असें वचन आहे. व त्या लोकामध्यें जो जारकर्म करील त्याचे अर्धे पातक तो भोगील व अर्धे तुला भोगावे लागेल व या पापकर्मामुळें तुझें इंद्रपद स्थिर राहाणार नाहीं, असा तुला शाप दिला. आणि ज्या अर्थी रूप व यौवन ह्यांनीं संपन्न असलेली तूं स्थिर राहिली नाहींस त्या अर्थी जगतामध्यें तूं एकटीच रुपवती राहाणार नाहींस. सर्वही प्रजा तुझें रूप वाटून घेतील, (अर्थात् त्या योगाने तुझें कमी होईल.)

या उदाहरणाप्रमाणें दगडाजवळ राहा असा त्या वाक्याचा अर्थ होतो. जर दगड हो असा गौतमांनीं शाप दिला असता तर

' निराहारा दिवारात्रं तपः परममास्थिता ॥
आतपानिलवर्षादिसहिष्णुः परमेश्वरम् ॥
ध्यायन्ती राममेकाग्रमनसा हृदि ॥ " अ. रा. १।५।२८।२९

असें गौतमानें म्हटलें नसतें. कारण हें आज्ञापालन व्रत दगड करूं शकत नाहीं. शिवाय गौतम रागावला तेव्हां अहल्या कुटींत होती. तेथें उष्णता व जल यांचा संपर्क होणें संभवत नाहीं. कदाचित तिला कुटीच्या बाहेर बोलावून त्यानें तिला दगड केलें अशी कल्पना करून अध्यात्माची बाजू सांवरून धरली तरी गौतमाच्या आश्रमाच्या पलीकडे गंगानदी मुळींच नाहीं असें वाल्मीकीवरून दिसतें व अनुभवही × तसाच आहे; परंतु

---

असा त्यानें अहल्येस शाप दिला. तेव्हांपासून पुष्कळ स्त्रिया रूपसंपन्न होऊं लागल्या अहल्येला शाप दिल्यावर ती म्हणाली, " हे विप्र देवानें आपलें रूप धारण केलेलें मला न समजल्यामुळें त्यानें माझा उपभोग घेतला. माझ्या इच्छेनें त्याला उपभोग घडला नाहीं. म्हणून आपण मजवर कृपा करावी. " असे तिनें म्हटल्यावर " इक्ष्वाकुवंशामध्यें महातेजस्वी राम उत्पन्न होईल. तो मनुष्यरूप धारण केलेला विष्णु ब्राह्मणाकरितां रानामध्यें येईल. त्याचें आदरातिथ्य तूं करशील तेव्हां त्याचे दर्शनानें तूं पवित्र होऊन माझ्या समीप येशील. " ह्याप्रमाणें बोलून तो तपास निघून गेला. व ती तेथें फारच मोठें तप करूं लागली. सारांश, " अशा पापामुळें तुला असें दुःख भोगावें लागलें. याकरितां तूं आतां वैष्णव याग कर म्हणजे पापमुक्त होशील. " असें त्या ब्रह्मदेवानें इंद्रास सांगितलें. वा. रा. उ. कां. स. ३१. ह्यांतही ' दगड हो ' असा गौतमानें अहल्येस शाप दिला हें लिहिलें नाहीं व रामानें दगडाची स्त्री केली नाहीं. अर्थात् भारतवर्षीय प्राचीन ऐतिहासिक कोशकारानें जें लिहिलें तें चूक आहे, असें म्हणणें भाग पडतें.

× काशीनिवासी वीरराघवाचार्य रामानुजी हे मिथिलेस जाऊन आलेले सांगतात कीं, गौतमाचा आश्रम हिमालयाच्या पायथ्याशीं आहे. ( वास्तविक हा शिवालिक पहाड होय. ) गौतमाचा आश्रम व मिथिला यांच्यामध्यें गंगा नदी नाहीं. अर्थात् अध्यात्मांतील कोळ्याचा प्रसंग चूक आहे.

रामायण कालानंतर तीन हजार वर्षांनीं म्हणजे इ. स. सातवें शतकांत तयार झालेल्या अध्यात्मरामायणकाराने श्रीरामांच्या अंगीं कर्तुमकर्तुमन्यथा कर्तुम् ही शक्ति आहे हें दाखवून ते विष्णूच होत असें आरंभापासून वर्णन केल्यामुळें त्यांच्या अंगीं अद्भुत सामर्थ्य लावलें व त्याचाच अनुवाद इतर* कवींनीं केला; पण हें वर्णन ऐतिहासिकदृष्ट्या असत्य ठरतें.

आनंद रामायणांत,

रामलक्ष्मणसंयुक्तो मुनिस्तं ( मिथिलां ) नगरं ययौ ॥
गमनावसरे मार्गे भर्तृशप्तां शिलां मुनिः ॥ १६ ॥

मुनिरूपमहेंद्रेण भुक्तां रहसि शोभनां ॥
गौतमस्यांगनां नाम्नाहल्यामकथयत्तयोः ॥ १७ ॥ ”

नंतर “ नदीरूपा जनस्थानेऽहल्या गौतमशापतः ॥

रामेण भ्रमतारण्ये स्वांघ्रिस्पर्शात्समुद्धृता ॥२१॥ ” असे श्लोक आहेत. ( आ. रा. सा. का. स. ३ )

परंतु हा उल्लेख कोणी दुसऱ्याने केला नाही. अर्थात हे मत कोणाला ग्राह्य नाही म्हणून त्या संबंधाने येथे विचारही केला नाही. ह्या श्लोकानंतर

*तुलसीदासानें बहुतेक कथाभाग अध्यात्मावरून घेतला असें रामेश्वर-भट्ट तुलसीकृत रामायणाच्या भूमिकेंत लिहितात. ( तु. ए. भू. पा. ९ नि. सा. प्रे. प्र. ). त्या रामायणांत अध्यात्माप्रमाणें अहल्योद्धार झाल्यावर ‘ चले राम लक्ष्मण मुनिसंगा । गए जहां जगपावनि गंगा ’ असें लिहून जें प्रक्षिप्त कथानक अहल्योद्धाराच्या पूर्वी वाल्मीकींत लिहिलें तोच कथा प्रसंग ‘ चले राम ’ या चौपाईचे नंतर वर्णन केला; पण तो तुलसीकृत नव्हे क्षेपक आहे असें तेथें लिहिलें; पण तेथेंही नावाड्याची गोष्ट लिहिली नाहीं. आमच्या मतें क्षेपकाच्या पूर्वींची चौपाई ‘ चले रामलक्ष्मण ’ व शेवटली ‘ तव प्रभु ऋषिसमेत अन्हाये। विविध दान महिदेव न पाये ’ ह्या चौपाया क्षेपक आहेत. कारण यांचा संबंध रामकथेशीं नसून क्षेपकाशीं आहे. व हें सर्व वर्णन वंध्येच्या पुत्राच्या लग्नप्रसंगाच्या वर्णनासारखें आहे. असेंच वर्णन बहुतेक मराठी कवींनीं केलें; पण ही सर्व अंधश्रद्धा.

रामे नौकां कांक्षमाणे नौकापो वाक्यमब्रवीत् ॥ २४ ॥
आदावहं क्षालयित्वा पादरेणुस्तव प्रभो ।
पश्चान्नौकां स्पर्शयामि तव पादे रघूद्वह ॥ २५ ॥
नोचेत्त्वत्पादरजसा स्पृष्टा नारी भविष्यति ।
अस्ति मे गृहिणी गेहे किंकरोम्यपरां स्त्रियम् ॥ २६ ॥

असें लिहिलें. अर्थात मागील विचाराप्रमाणें हेंही वास्तवार्थाला धरून नसल्यामुळें केवळ रोचक आहे असें ठरलें. +

कित्येकांच्या मतें अहल्योद्धार हें प्रकरण ऐतिहासिक नसून काल्पनिक आहे. कारण वेदांत अहल्या हें नांव उषेचें आहे. व

" शुक्रःशु शुक्वाँउषोन जारः " "उषोनजारो विभावोस्त्रः"

ह्या मंत्रांत इंद्राला उषेचा जार म्हटलें ( ऋ. अ. १ सू. ६९ मं. १, ५) पण ह्या ठिकाणी हें लक्षांत ठेवावें कीं, वेदांतील इंद्र व उषा ह्या कांहीं देहधारी व्यक्ति नव्हेत. ह्या नैसर्गिक देवता असून त्यांचे अलंकारिक वर्णन वेदानें केलें. कोणी म्हणतात याच रूपकाचा विस्तार करून वाल्मीकींनी कथानक रचिलें. हें जर सत्य मानिलें तर गौतमाचा पुत्र शतानंद हा जनकाचा पुरोहित होता, ह्या ऐतिहासिक गोष्टीची काय वासलात लागेल? अर्थात अहल्येचा पुत्र शतानंद हा जर ऐतिहासिक धरला तर गौतम व अहल्या ह्याही व्यक्ति ऐतिहासिकच आहेत हें सिद्ध होतें. आतां राहिला इंद्र हा काल्पनिक आहे किंवा ऐतिहासिक आहे याचा विचार करूं.

भरतखंडांत देव, दैत्य, सिद्ध, गंधर्व, विद्याधर, किंपुरुष, पैत्रिक, आर्य, मानव, गुह्यक, राक्षस व पिशाच्च ह्या जातीचे लोक राहात होते असें वामन-

---

+ आनंद रामायण हें अध्यात्म रामायणाच्या पूर्वी झालें असा कित्येकांचा तर्क आहे. तो खरा धरला तर आनंद रामायणाचे रोचक विचार अध्यात्मकाराने घेतले असे म्हणावे लागेल. हें कथानक खऱ्या मिथिला नगरीला धरून नाही. कदाचित् गौतमाश्रम व मिथिला हे दोन्ही नवीनच कल्पिले असतील तर नकळे. परंतु संकेत रामायणांत हें कथानक वनवास प्रसंगांत वर्णन केलें आहे.

पुराणांत सांगितलें, त्याच लोकांपैकीं पामीर पाठारावर राहाणारे आर्य आपणास देव म्हणवीत असत, व त्या पामीरलाच स्वर्ग ही संज्ञा होती, असें वायुपुराणावरून समजतें. तेथील राजाला इंद्र हें नांव होतें. येथील व्यवस्था कांहोंशी लोकसत्तेसारखी होती, व इंद्राधिकारही कांहीं अटीवर अवलंबून असल्यामुळें त्या अटी इतरांकडून पूर्ण न होतील अशा तऱ्हेची खटपट स्थानापन्न इंद्र करीत असे. म्हणजे कोणी तपश्चर्या करीत असला तर तो इंद्रपद घेण्याचीच खटपट करीत आहे अशा शंकेने तो यज्ञांत अथवा तपांत विघ्न करीत असे. अशा प्रकारच्या उपद्व्यापी स्वभावाप्रमाणें त्यानें गौतमाच्या पुण्यांत उणेपणा पाडण्याकरितां त्याच्या पतिव्रता स्त्रियेला भ्रष्ट केलें. त्याचें दुष्ट कृत्य समजण्याबरोबर गौतमानें त्याला वृषणरहित करून पुरुषत्वापासून भ्रष्ट केलें. पुढें तो इंद्र स्वस्थानीं गेल्यावर सिद्ध, गंधर्व, चारण व अग्निप्रभृति देवांना ( सभासदांना ) म्हणाला,

कुर्वता तपसो विघ्नं गौतमस्य महात्मनः ॥
क्रोधमुत्पाद्य हि मयासुरकार्यमिदं कृतम् ॥ २ ॥
अफलोऽस्मि कृतस्तेनक्रोधात्सा च निराकृता ॥
शापमोक्षेणमहता तपोऽस्यापहृतं मया ॥ ३ ॥
तन्मां सुरवराः सर्वे सर्षिसंघः सचारणाः ॥
सरकार्यकरं यूयं सफलं कर्तुमर्हथ ॥ ४ ॥ " [ वा. रा. १४९ ]

अर्थः—" महात्मा गौतमाच्या तपामध्यें विघ्न यावें एतदर्थ त्याला क्रोध आणून [ त्याच्या तपाचें फल जी इंद्रपदप्राप्ति ती त्याला न मिळूं देणें ] हें देवकार्य मीं केलें. असें नसतें मीं केलें तर त्याच्या उग्र तपाने तो इंद्र होऊन येथें मानव अधिकारी झाले असते व मग तुम्हा देवांना स्थानभ्रष्ट व्हावें लागलें असतें. आतां मीं जें तुम्हांकरितां कृत्य केलें त्याचें फल ( क्रोधामुळें रागारागानें ) त्यानें मला वृषणरहित केलें व तिचा ( अहल्येचा ) ही शापपूर्वक परित्याग केला. अशा रीतीनें त्याला मोठा शाप देण्याला लावून मीं त्याचें तप हरण केलें. तस्मात् ऋषिसमुदाय चारण ह्यांसहवर्तमान सर्व सुरश्रेष्ठ हो, माझ्या स्थितीचा विचार करून जेणेंकरून मी देवकार्य करण्यास योग्य होईन अशा रीतीनें मला तुम्ही वृषणयुक्त करा. "

हें त्याचें म्हणणें ऐकून देवांनीं पितृगणाला सांगून त्याच्या यज्ञांतील बकऱ्याचें वृषण काढून इंद्रास लावलें व त्यायोगानें तो इंद्र पूर्ववत् पौरुषयुक्त झाला. *

ह्या विवेचनावरून पामीरवरील आर्यांचा राजा इंद्र यानें अहल्येला भ्रष्ट केलें तेव्हा गौतमानें त्याला वृषणरहित केलें व अहल्येस कांहीं नियम सांगून पापक्षालनार्थ तपश्चर्या करावयास लावून स्वतः आश्रम सोडून निघून गेला हें सिद्ध झालें. आतां इंद्रानें अहल्येस भ्रष्ट केलें त्यांत अहल्येचा कांहीं अपराध आहे काय ? तिचा अपराध नसला तर गौतमांनीं तिचा त्याग अन्यायानें केला असें म्हणावें लागेल. व ती अपराधी असेल तर जाणूनबुजून दुराचरण करणाऱ्या स्त्रियेची पतिव्रतांत गणती कशी झाली ? इत्यादि प्रश्न उद्भवतात. त्याचा विचार करूं.

इंद्रानें गौतमाचे सोंग घेतलें होतें. तरी त्याच्या मूळस्वरूपांत कांहीं बदल झाला होता असें दिसत नाहीं. कारण तो येण्याबरोबर

" मुनिवेषं सहस्राक्षं विज्ञाय०:...
मतिं चकार दुर्मेधा देवराज कुतूहलात् ॥
अथाब्रवीत्सुरश्रेष्ठं कृतार्थेनान्तारात्मा ॥
कृतार्थास्मि सुरश्रेष्ठ गच्छ शीघ्रमितः प्रभो ॥ २ ॥ " ( वा. रा. १।४८।१०.२० )

असें वाल्मीकींनीं लिहिलें. ह्यांत प्रथमतःच तो इंद्र आहे असें ओळखून त्याच्याशीं रममाण व्हावें असें तिनें मनांत आणलें म्हणूनच वाल्मीकींनीं तिला 'दुर्मेधा' म्हटलें. आणि समागम झाल्यावरही प्रसन्न अंतःकाणानें ती त्याला म्हणाली, " हे प्रभो, मी आज कृतकृत्य झालें ( आतां माझा पति घरीं येण्याची वेळ झाली करितां ) तुम्ही सत्वर निघून जा." हें तिचें कृत्य अत्यंत जारिणी स्त्रियेसारखें झालें. म्हणून ती वृंदेची बरोबरी करूं शकत नाहीं. वृंदेला विष्णूनें तिच्या नवऱ्याचें हुबेहूब इतकें बेमालूम रूप घेऊन फसविलें कीं, समागम झाल्यावरही मी परपुरुषाशीं रत झालें असें तिच्या मनांत आलें नाहीं. शेवटीं

*ह्यावरून अति प्राचीन काळीं आर्य शस्त्रक्रिया ( सर्जरी ) किती उच्चतेला पोहोंचली होती हें वाचकांच्या लक्षांत येईलच.

आपण पातिव्रत्यापासून भ्रष्ट झालों हें तिला समजावें म्हणून रतिप्रसंगांतच तिला आपलें मूळचें चतुर्भुजरूप दाखविलें. पण तें रूप पाहून तिला संतोष वाटणें तर एकीकडेच राहिलें. उलट रागावून तिनें विष्णूस शाप दिला व स्वतः आपला देह जाळून घेतला. म्हणून अशा पतिव्रतेची अहल्या बरोबरी करीत नाहीं असें वर म्हटलें. अशा प्रकारची जरी ती दुष्ट होती तरी गौतमांनीं ' तूं दगड हो " असा भयंकर शाप न देतां

'इह वर्षसहस्राणि बहूनि निवसिष्यसि'
" वातभक्षा निराहारा तप्यन्ती भस्मशायिनी ॥
अदृश्या सर्वभूतानामाश्रमेऽस्मिन्वसिष्यसि ॥ "
असें तिला सांगितले. ( वा. रा. १।४८।२९-३० ) कारण
' विप्रदुष्टां स्त्रियं भर्ता निरुंध्यादेकवेश्मनि ॥
यत्पुंसः परदारेषु तच्चैनां कारयेद्व्रतम् ॥ ' १७६ ॥

म्हणजे जी स्त्री अत्यंत दुष्ट असेल ( स्वतः पर पुरुषाला बोलावून त्याच्याशीं रत झाली असेल ) तर भर्त्यानें ( ती कोणाच्या दृष्टीस पडणार नाहीं अशा रीतीनें ) एका घरांत कोंडून ठेवावी व परदारागमनाविषयीं पुरुषाला जें प्रायश्चित सांगितलें आहे तेंच प्रायश्चित्त तिच्याकडून करवावें असें वचन आहे. ( म. अ. ११ वा ) आणि इतकेंही करून पुनः ती तसलेंच पातक करील तर तिला ' प्राजापत्यकृच्छ्र व चांद्रायण व्रत' करावयास लावून शुद्ध करून घ्यावें असें मनु म्हणतो ( म. ॥ १७७ ) हा प्रसंग तिच्यावर येऊं नये म्हणून ' दाशरथी राम आल्यावर ( इंद्राला पाहून जशी तूं मोहित झालीस तशी मोहित न होतां ) निष्काम त्याचा सत्कार करशील तर आपली पूर्वीची तनु धारण करून माझ्याजवळ येशील. अर्थात् मीं सांगितल्याप्रमाणें आचरण करशील तर तूं पूर्वीप्रमाणेंच शुद्ध आहेस असें समजून मी तुझा स्वीकार करीन अशा अर्थाचें भाषण करून गौतम निघून गेले. पुढें विश्वामित्रासह श्रीरामांनीं त्या आश्रमांत प्रवेश केला तेव्हां निजलेली अहल्या तपानें तेजस्वी दिसली. तेव्हां श्रीरामानें तिला नमस्कार केला. पुरुषाचा स्पर्श होण्याबरोबर ती उठून उभी राहिली व तो अत्यंत सुंदर असलेला पुरुष दाशरथी राम होय हें समजतांच तिनें त्याचा चांगला सत्कार केला.

व ती पश्चातापपूर्वक पतीच्या आज्ञेप्रमाणें व्रताचरण करीत राहिली त्या अर्थी ती दोषमुक्त झाली असें मानून रामानें तिच्या सत्काराचा स्वीकार केला. आतां दूषित स्त्रियाही पतिव्रता कशा राहातात या विषयीं भारतांतील अहल्येचें उदाहरण सांगून नंतर ही रामायणांतील अहल्या पतिव्रता कशी राहिली हें सांगतो.

अंगीरस कुलामध्यें गौतम नांवाचे ऋषि होऊन गेले. त्यांच्या घरी एक वेळ इंद्र ब्राह्मणाचें सोंग घेऊन अतिथिरूपानें आला. गौतमांनीं त्याचा चांगला सत्कार केला; पण पुढें तो त्याच्या स्त्रियेशीं रत झाला. हें पाहून गौतमांनीं आपल्या चिरकारी नावाच्या पुत्रास स्त्रियेचा ( चिरकारीच्या मातेचा ) वध करावयास सांगून स्त्रियेचा त्याग केला व स्वतः वनांत तपश्चर्या करावयास निघून गेले.

नंतर चिरकारी विचार करूं लागला कीं

" पितुराज्ञा कथं कुर्यां न हन्यां मातरं कथम् ॥
कथं धर्मच्छलेनास्मिन्निमज्जेयमसाधुवत् ॥ १० ॥
पितुराज्ञा परो धर्मः स्वधर्मो मातृरक्षणम् ॥
अस्वतंत्रं च पुत्रत्वं किंतु मां नानुपीडयेत् ॥ ११ ॥
स्त्रियं हत्वा मातरं च को हि जातु सुखी भवेत् ॥
पितरं चाप्यवज्ञाय कःप्रतिष्ठामवाप्नुयात् ॥ १२ ॥

याप्रमाणें मतापित्याविषयीं विचार करून ज्याअर्थी स्त्रियेच्या रक्षणाविषयीं सर्वस्वी भार तिच्या पतीवर आहे त्याअर्थी तिच्याकडून दुष्कृत्य घडलें तरी

"नापराधोस्ति नारीणां नर एवापराध्यति"

असा निर्णय करून त्यानें आपल्या मातेचा वध केला नाहीं. पुढें गौतम घरीं आल्यावर त्यांना हे समजलें तेव्हां पश्चात्तापपूर्वक ते म्हणाले

'एवं न स्त्री न चैवाहं नाध्वगस्त्रिदशेश्वर
अपराध्यति धर्मस्य प्रमादस्त्वपराध्यति' ॥ ५० ॥

असें म्हणून मातेचें रक्षण केल्याबद्दल पुत्रास शाबासकी देऊन स्त्रियेचा स्वीकार केला ( म. भा. शा. प. अ. २६७ ) अर्थात त्यांनी तिला साध्वी ठरविलें. एकंदरींत ह्या चरित्रावरून व "अदुष्टास्तुस्त्रियो...."ह.वं.भ. प. अ. ५ श्लो. ३८ ह्या वचनावरून अहल्या निर्दोषी ठरते. दुसरे जरी तिच्याकडून अपराध झालातरी त्याबद्दल पश्चाताप करून तिनें पतीची आज्ञा अक्षरशः पाळली म्हणून श्रीरामांनीं ती शुद्ध आहे असें ठरवून तिच्या आतिथ्याचा स्वीकार केला. आणि ज्याअर्थी श्रीरामासारख्या थोर पुरुषांनीं ती पवित्र ठरविली तिला आपण अपवित्र म्हणणें हा दोष आहे. कारण पूर्वी असेंच ठरलें होतें. असा विचार करून त्यांनीं तिचा स्वीकार केला.

ह्या चरित्रावरून जे सिद्धांत निघतात ते हेः

१ गौतमांनीं अहल्येस शिळा हो असा शाप दिला नाहीं.

२ श्रीरामांनीं दगडाची स्त्री केली नाहीं. तर अहल्येची एकनिष्ठतेनें पतिआज्ञापालनरूप तपश्चर्या पाहून तिचें आतिथ्य स्वीकारून तिला पुनीत केलें हाच अहल्योद्धार.

३ अध्यात्मांतील नाविकाचा वृत्तांत अस्थानी असून काल्पनिक आहे.

४ शास्त्राप्रमाणें व पतिआज्ञापालनरूप तपश्चर्येनें अहल्येची गणना पतिव्रतांत झाली.

ह्याप्रमाणें अहल्योद्धाराचा हा लहानसा निबंध लिहून सद्गुरुचरणारविंदी, अर्पण केला.

**—स्वामी कृष्णानंद,**
( पूर्वाश्रमीचे कृष्ण जोगेश्वर भीष्म )
मनोपा, नागपूर.

**टीप :** परम साईभक्त, शिरडी येथे रामनवमीच्या दिवशी होणाऱ्या रामजन्मोत्सवाचे जनक, वेदशास्त्रपुराणांचे ज्ञाते स्वामी कृष्णानंद यांनी संशोधक व अभ्यासपूर्वक वृत्तीने लिहिलेला वरील निबंध श्रीसाईलीला मासिकाच्या आठव्या वर्षाच्या दहाव्या अंकात प्रसिद्ध झाला होता. श्रीसाईलीलेच्या हलीच्या वाचकांनाही तो मनोवेधक वाटेल व आवडेल असे वाटल्यावरून तो निबंध या अंकात पुनः प्रकाशित करण्यात येत आहे.

—संपादक

# शाहीर खाडिलकर यांच्या शंका
# व
# त्यांचे निरसन.

प्रभु रामचंद्रांना काही शंका विचारणारा लेख श्रीसाईलीलेचे सन्यसाची लेखक शाहीर खाडिलकर यांच्याकडून आमचेकडे आला. त्याच्या पाठोपाठच प्रभु रामचंद्रांनी त्यांस पाठविलेले उत्तरही आमच्या हाती आले. कदाचित लेखकाने आपल्या लेखाची प्रत प्रभु रामचंद्रांकडे अगाऊ पाठविली असेल- श्रीसाईलीलेच्या कार्यालयाच्या कार्यक्षमतेवर विश्वास नसल्यामुळे--आणि प्रभुजींनी त्यास तत्परतेने उत्तर लिहिले असेल. अथवा सर्वज्ञ प्रभूला श्री. खाडिलकरांच्या मनातले विचार अगोदरच समजले असतील व त्याचे उत्तर तयार करून ते श्री. खाडिलकराचे लेखासमवेतच साईलीलेच्या कार्यालयात पोहोचेल अशी त्याने व्यवस्था केली असेल. आम्ही आमच्या वाचकांच्या माहितीसाठी श्री. खाडिलकर यांचा लेख व त्यास प्रभु रामचंद्रांनी पाठविलेले उत्तर प्रसिद्ध करीत आहोत.

( १ )

## श्रीरामचंद्रप्रभो, आमच्या शंकांचे निरसन करा.

लेखक :– **शाहीर खाडिलकर, एम्. ए., बी. टी.**

श्रीरामचंद्रा, आपल्या पदकमलांना त्रिवार वंदन करून आपणांशी जरा मनमोकळेपणाने बोलण्याचे मी सर्व मानवांच्या वतीने धाडस करीत आहे याबद्दल आपण मजवर रागावू नये. आपण रागावाल अशी कल्पनाच करणे हेच मुळी योग्य नाही असेही मला वाटत आहे. शिवाय आपला

राग म्हणजे आमच्यावर केलेली महाकृपाच होय. रागावून रागावून काय कराल ! आमचा उद्धारच ना ? अंतरिक्षात मेघ जमले आणि ते खूप रागावले. काय करतील ? पर्जन्यधाराच देतील ना ? आई खूप खूप रागावली; काय करील बाळाला ? एक दोन प्रेमाचे धपाटे देईल ! आपणांस दोन चार शंका विचारणार आहे. या शंकांचा उलगडा आम्हा पामराच्या अल्पबुद्धीला करता येत नाही. मात्र या शंकांचे तरंग मानवी मन:सागरच्या पृष्ठभागावर येत असतात हे खरे आहे.

अनंतकोटिब्रह्माण्डनायक, कर्तुमर्तुमन्यथाकर्तु, समर्थ, अशी आपली बिरुदावली आज हजारों वर्षे आम्ही ऐकत आलो आहो. रघुकुलाचे नाव सर्वतोमुखी आहे. या कुलात जन्मलेल्या राजेश्वरांचे औदार्य, त्यांचा त्याग, त्यांची सेवावृत्ति, त्यांची प्रजापालनतत्परता, त्यांचे शौर्य इत्यादि सर्व गुण अन्य राजवंशांत क्वचित दिसून येतात. दिलीपाची कामधेनुसेवा कोठे दिसेल ? रघूची दानशूरता कोठे आढळेल ? अजाचे पत्नीप्रेम केवळ अलौकिकच ! दशरथाने इंद्रास दिलेले सहाय्य बिनतोडच ! अशा कुळात जन्म घेऊन आपणही सर्वांच्या वर कळस चढविला ! आपण साक्षात विष्णुच मानवरूपाने पृथ्वीवर अवतरलात असे लोक म्हणू लागले. आपण आपल्या अवतारचरित्रात अनेक आदर्श निर्माण केले आहेत. आपण मर्यादा-पुरुषोत्तम झालात. महाकवि वाल्मीकींनी आपले चरित्र काव्यबद्ध करून ते आम्हांस अमूल्य ठेवा म्हणून दिले आहे. आपले चरित्र गाणारे धन्य झाले, मुक्त झाले, कृतकृत्य झाले ! आज ही होत आहेत. प्रचलित सर्व भाषांतून आपल्या उज्ज्वल चरित्रावर काव्ये, नाटके, महाकाव्ये, लघुकाव्ये, आणि इतर अनेक छोटी मोठी काव्ये अस्तित्वात आली. इतकेच काय की केवळ आपले नुसते नाव घेतल्याने माणसांना अचाट शक्ति लाभते, सद्विचार फैलावतात, अंत:करण शुद्ध व निर्मल होते आणि जन्ममरणाचा फेरा चुकतो असे सर्वत्र मानण्यात येऊ लागले. मूर्तीरूपाने, मंदिररूपाने आपली स्मारके ठायीठायी उभारली गेली आणि आजही उभारली जात आहेत. एवंच आपल्या नांवाने प्रयेक आर्यवंशीय अंतर्बाह्य भरून गेला आहे आणि इतर धर्मीय बांधव सुद्धा आपल्या निर्मल चारित्र्याचा आरसा आपणापुढे ठेवीत आहेत. इतकी कीर्ती, इतकी भक्ती, इतकी श्रद्धा आणि इतकी प्राणप्रिय आत्मीयता दुसऱ्या कोणासही

लाभली नाही. आपल्या चरित्राचा मानदंड घेऊन त्याने प्रत्येकाने आपले चरित्र, मापावे, व आपण किती क्षुद्र आहोत हे नीट समजून घ्यावे असेच प्रत्येकास वाटत असते. आपण जीवात्मा होऊन मानवदेही अवतरलात आणि आपल्या आदर्श जीवनक्रमाने याच जन्मी परमात्मा स्वरूप झालात. लोक आपणांस अयोध्या-पति न मानता ब्रह्मांडकर्ता असे समजू लागले हा केवढा महिमा !

आपले चरित्र असे सर्वांना चटका लावणारे अपूर्व ठरले आहे. आणि रामायण म्हणजे आदर्शांचा अपूर्व ठेवा झाला आहे. आदर्श पुत्र, आदर्श बंधु, आदर्श गृहिणी, आदर्श सेवाव्रती, आदर्श नृपतित्व, तसेच आदर्श सुहृदत्व असे अनेक आदर्श आम्हांस आपल्या चरित्रात पाहावयास मिळतात. श्रीरामसरोवरात जणु ही सर्व अत्यंत सुंदर अशी नानारंगी कमळेच फुलली आहेत. यौवराज्यपदावर लाथ मारून केवळ पितृवचन पूर्ण करण्यासाठी चौदा वर्षे वनवास पत्करणारा सत्पुत्र कोठे मिळेल बरे ? पतीच्या पावलावर पाऊल ठेवून खडतर आणि भयानक अवस्था भोगणारी सीतेसारखी धर्मपत्नीहि विरळाच. अन तिच्यासाठी तिचा वियोग झाल्यावर सतत तळमळणारा आणि आदर्श गृहस्थधर्म अथवा पतिधर्म शिकविणारा व आचरणारा श्रीरामचंद्रही विरळाच ! पतिधर्माला आणि गृहस्थाश्रमाला योग्य प्रतिष्ठा आपणच आपल्या जळत्या जीवनाने प्राप्त करून दिलीत हे मानव कसा बरे विसरेल ? लक्ष्मण भरतासारखे भाऊ आणि तेही सापत्न बंधू कोठेही मिळणार नाहीत ! हनुमंतासारखा सखा, सेवक आणि विनम्र सहाय्यक कालत्रयी मिळणार नाही ! हे सर्व ठीक आहे. पण लक्ष्मणाला आणि भरताला आपणांकडून समाधानकारक न्याय मिळाला नाही अशी हुरहूर आमच्या मनाला लागून राहिली आहे. लक्ष्मणाचे जीवन कसे निष्कलंक चकचकत्या तेजस्वी ताऱ्यासारखे आम्हांस दिसत आहे. त्याच्या त्यागाला सीमाच नाही ! पितृ-वचन पूर्ण करण्यासाठी आपण वनवासाला गेलात हे ठीक असेल. सीता-माईला ही आपणांबरोबर यावेच लागले हे ही मान्य करू. पण लक्ष्मणाला तसे आपणांबरोबर येण्याचे काहीच कारण नव्हते. पण त्याने सर्वस्वाचा त्याग करून आपणांबरोबर येण्याचे ठरविले आणि सर्व बऱ्यावाईटांचा तो धनी झाला. जणु काय आपली सावलीच अशा आत्मीयतेने तो शेवटपर्यंत राहिला.

जेथे राम तेथे सीता हे आर्यधर्माला शोभण्यासरखे आहे. पण जेथे राम तेथेच लक्ष्मण हे अपूर्वच आहे! अत्यंत शिस्तप्रिय असा भाऊ की कधी बिचाऱ्यानें मान वर करून आपणास व सीतामाईस पाहिले सुद्धा नाही. पंचवटीत झोपडीसाठी जागा निवडली लक्ष्मणाने! झोपडी बांधणें नंतरची सर्व व्यवस्था ही याचीच! जळण काटूक, पाणी, कंदमुळें फळें सर्व काही त्यानेच आणा-वयाचे! संरक्षणाचे काम ही त्याचेच! कांचनमृगाचा हट्ट सीतेचा! तो पुरवण्यासाठी लक्ष्मणाला मागे सीतेचे संरक्षण करण्यासाठी ठेवून आपण गेलात. आपल्या आवाजासारखाच मायावी आवाज ऐकून आणि 'धांव लक्ष्मणा धांव, धांव' असे ऐकून सीता घाबरली आणि तिने आपल्या मदतीसाठी जाण्यास लक्ष्मणाला सांगितले! त्या वेळी त्याची मन:स्थिती कशी झाली असेल याची कल्पना आहे कां तुम्हांला? सीतेला सोडून लक्ष्मण जाईना! रामचंद्र हा सर्व संकटे पचवून टाकणारा आहे त्याची काळजी नको इत्यादि त्याने सीतेला सांगितले! पण ते तिला पटले नाही! आणि यात तिचे ही काही गैर नव्हते. ती लक्ष्मणाला नाना तऱ्हेने बोलू लागली आणि नाना शंका दाखवू लागली. तेव्हां बिचारा लक्ष्मण आपणाकडे निघून गेला. पण आपण दोघेजण परत आलात तों काय पाहिले? मृग ही नाही आणि सीता ही नाही. तेव्हा लक्ष्मणाला किती वाईट वाटले असेल, आणि आपण त्याला कडाडून बोलला असाल! ते सर्व या भावाने शांतपणे पचविले. सीता-शोधार्थ आपण दक्षिणेकडे गेलात. वानरसेना घेऊन लंकेवर स्वारी केलीत आणि रावणाशी संघर्ष सुरु झाला. तेव्हा इंद्रजितानें सोडलेली शक्ति लक्ष्मणाला लागली. हनुमान होता म्हणून औषधयोजना झाली आणि लक्ष्मण बरा झाला.

रावणवध झाल्यावर आपण परत अयोध्येला गेलात. मोठा दरबार भरला तेव्हां यथोचित सर्वांना बक्षिसे दिलीत. पण लक्ष्मण मात्र चवरी ढाळीत आपल्यामागेच उभा. हनुमंताला अमरत्व दिलेत. सुग्रीवाला किष्किंधेचे राज्य आणि बिभीषणाला लंकेचे राज्य मिळाले. लक्ष्मणाच्या पत्नीला उर्मिलेला काय मिळाले ते कळतच नाही! तिने कसे दिवस काढले असतील बरे! लक्ष्मणाला असा न्याय मिळाला!

आता भरताकडे पहा. याने तरी कमालच केली. मातुलगृहातून आल्या-वर जेव्हा त्याला सर्व हकीकत समजली तेव्हा तो संतप्त झाला आणि आईला नको नको ते बोलला. राज्य झिडकारून दिले आणि आपणास परत बोलविण्या-

साठी तोही वल्कले धारण करून चित्रकुटापर्यंत गेला. आपण त्याला राज्य-पद स्वीकारुन आईस संतुष्ट करावे आणि प्रजापालन करावे, आपण पितृवचन पूर्ण करीत आहोत असे नाना तऱ्हेने सांगितले. पण तो कसल्याही आमिषाला बळी पडला नाही. शाब्बास भरता ! इतकेच नाही तर चौदा वर्षे नंदीग्रामी वल्कले परिधान करुन व्रतस्थ राहिला आणि आपला प्रतिनिधि म्हणून राज्य चालविले. केवढा त्याग हा, केवढी भक्ति ! केवढे बंधुप्रेम पण अशा प्रेमळ भावालाही रामयणात फारसा न्याय मिळालेला नाही.

आपल्या सूर्याप्रमाणे तळपणाऱ्या तेजात यांचे तेज विरुन गेले असाच अर्थ आम्ही करावा काय? जो तो रामनामजप करतो, पण लक्ष्मण किंवा भरत नाम तितक्याच भावनेने घेताना कोणीही दिसत नाही. असे कां ? आपण अशा आदर्श भावांना कोणता न्याय दिलात ते आम्हांस कळत नाही. तरी या शंकांचें निरसन येईल काय ?

आपला **दासानुदास**—

**शाहीर खाडिलकर, एम्. ए. बी. टी.**

(२)

# प्रभु रामचंद्रांचे उत्तर

**भक्तश्रेष्ठ शाहीर खाडिलकर यासी सप्रेम आशीर्वाद.**

तूं तुझ्या शंका माझ्यापुढे मांडल्यास हे बरे झाले. तुझ्या शाहिरी प्रथेला अनुसरून तूं आपल्या पोवाड्यांत जनतेच्या न्यायालयात त्या एकदम नेल्या नाहीस हे बरे केलेस. कारण माझी बाजू कितीही बळकट असली तरी भारताच्या आजच्या जनता न्यायालयात ती खरी असल्याचे ठरवून घेणे दगदगीचे झाले असते. हल्लीचे हे न्यायालय अजब आहे. निर्णय लागेपर्यंत ते आपला कल कसा कोणाकडे आहे हे अजिबात कळू देत नाही, आणि त्याच्या निर्णयाविरुद्ध अपील नसल्यामुळे आपल्या

निर्णयाच्या पाठीमागील कारणमीमांसाही व्यक्त करीत नाही. शिवाय आजच्या जमान्यातील न्यायालयात न्याय मिळवावयाचा म्हणजे त्यासाठी माझ्या वतीने फर्डा वकील उभा करावयास लागला असता. वाल्मीकि, कालिदास, भवभूती, एकनाथ, रामदास, मोरोपंत, तुळसीदास असे अनेक उत्तम वकील पूर्वी माझ्या वतीने होते. आजही हाक मारल्यास फिरून ते येणार नाहीत असे नाही, परंतु त्यांच्या जुन्या कार्यपद्धतीचा आजच्या न्यायालयावर कितपत प्रभाव पडेल याची शंकाच आहे. आजच्या जमान्यातही अण्णा माडगूळकरांसारखे माझे काही वकील आहेत आणि त्यांनी माझी कामे यशस्वी रीतीने केलेली आहेत; नाही असे नाही. पण माडगूळकरांना अन्य कामेही फार आहेत. त्यांची फीही जबरदस्त आहे. तशी आतापर्यंत मी त्यांना भरपूर फी दिली आहे पण तेवढयावर ते आणखी नवीन काम घेतील किंवा नाही सांगता येत नाही. आणि न्यायालयात पुराव्यानिशी तुझ्या तक्रारी व्यर्थ आहे सिद्ध केले असते तरी माझ्यापासून दूरदूर जाऊ पहाणाऱ्या हल्लीच्या तरुण पिढीला माझ्यापासून दूर होण्यासाठी उत्तम सबब मिळाली असती. निष्प्रभ होऊ पहाणाऱ्या माझ्या भोंवतीच्या तेजोवलयावर काही नाही तरी थोडीशी अधिक धूसरता आली असती. आणि म्हणूनच तूं आपल्या शाहिरी वृत्तीस आवाहन करून एकदम जनतान्यायालयाचा मार्ग स्वीकारला नाहीस याबद्दल तुझे मनःपूर्वक आभार ! आभार मानण्यापलिकडे मी काय करणार ? मज जवळ तुला देण्यासारख्या अन्य वस्तू म्हणजे श्रद्धा, निष्ठा, स्फूर्ति, प्रज्ञा, धैर्य, कविहृदय, मधुर वाणी. या सर्व गोष्टी तुझ्याजवळ योग्य प्रमाणांत आहेतच. यापैकी कोणतीही गोष्ट तुला आता दिल्यास तुझ्याजवळील गुणांचा समतोल बिघडेल आणि मग तूंच माझ्यावर रागावशील ! असो. आपण आता प्रस्तुताकडे वळू.

तुझी मुख्य तक्रार ही आहे की मी माझ्या भावांच्या सेवेची, माझ्या भावजयीच्या त्यागाची योग्य जाणीव ठेविली नाही, त्यांचा योग्य सन्मान केला नाही, रामायणकथेत त्यांना योग्य स्थान दिले नाही, जनमानसात त्यांच्या मूर्ती कोरून ठेवल्या नाहीत, त्यांच्या सेवेचे, भक्तीचे, माझ्याशी असलेल्या तद्रूपतेचे योग्य श्रेय त्याना दिले नाही, आणि हे योग्य झालेले नाही.

या बाबतीत प्रथमच तुला विचारावयाचे आहे ते हे की सबंध रामकथेत राम, लक्ष्मण, भरत व शत्रुघ्न यांच्यात काही अंतर असल्याचे तुला कोठे आढळले आहे काय? आपणात काही अंतर आहे एकरूपता, तादात्म्य नाही असे यांपैकी कोणास केव्हाही वाटले आहे काय ? रामायणात एक गोष्ट आहे ती ही की दशरथाचे चारी पुत्र व हनुमान हे सर्व एकरुप आहेत व लोकात ओळखली जाणारी रामकथा ही एकट्या रामाची नाही. या कथेला वाल्मीकींनी रामायण हे नाव दिलेले असले तरी तिला भरतायन, लक्ष्मणायन,शत्रुघ्नायन वा हनुमन्तायन म्हणूनहि म्हणावयास हरकत नाही. यातील मुख्य घटना रावणवधाची. ही घटना माझ्या हातून घडली, कारण माझ्या सर्व बधूंनी व हनुमंताने रावणवधाचे कार्य मजकडूनच घडावे असे इच्छिले. यासाठी आवश्यक असणारा पुरावा श्री एकनाथांनी आपल्या भावार्थरामायणात ठिकठिकाणी विखुरलेला आहे. तो गोळा करून येथे मांडण्याची आवश्यकता आहे असे मला वाटत नाही. रामायणाचा तुझा अभ्यास गाढ आहे. डोळे मिटून स्पष्ट दिसणाऱ्या गोष्टी तुला पहावयाच्या नसल्यास त्यास इलाज नाही.

दुसरी गोष्ट अशी की माझ्या प्रत्येक बंधूचे व हनुमंताचे व्यक्तित्व इतक्या उच्च कोटीचे होते की त्याबद्दलचा माझा आदर मला शब्दांत वा कृतींत व्यक्त करणे अशक्य होते. त्या व्यक्तित्वाची मी सदैव पूजा केलेली आहे. त्यास डावलण्याचा मी यत्किंचितही प्रयत्न केला नाही. वनवासास निघालो असताना मला परत नेण्यासाठी भरताने जे प्रयत्न केले त्यास वसिष्ठ गुरुंनी मला त्यावेळी आवश्यक ते सहाय्य केले नसते तर शरण जावे लागले असते. वनवासास आपण येणार हे लक्ष्मणाने निश्चित केल्यानंतर त्यास मोडता घालण्यासाठी मी वसिष्ठ गुरुंची आज्ञा घे म्हणून त्यास सांगितले. यावेळी व सीतेसही वनात मजबरोबर येण्यासाठी परवानगी द्यावयाच्या वेळी गुरूजींनी मला सहाय्य केले नाही. सुमित्रामाता वा जिची बाजू घेऊन तू हा कलह निर्माण करू पहात आहेस ती उर्मिलाही माझ्या बाजूच्या झाल्या नाहीत. वनवासाच्या सुरुवातीसही निरनिराळे युक्तिवाद करून अयोध्येस परत जाण्यासाठी लक्ष्मणाचे मन वळविण्याचा जो प्रयत्न केला त्यास वाल्मीकि साक्ष आहेत. परंतु लक्ष्मण कां कोणाचे ऐकत होता ? दिसावयास माझे सर्व बंधू व हनुमन्त माझ्या वचनात होते असे दिसते. परंतु त्याचे कारण बहुतेक वेळी माघार घेऊन मी त्यांच्या मनाप्रमाणे वागत होतो. चंद्रसेनेची हकिकत तू विसरलास काय ? आमचे प्राण वाचविणे व अहिरावण व महिरावण यांचा नाश करणे हे आवश्यक होते. परंतु हनुमन्ताने चंद्रसेनेस

मी तिच्या महालात येईन असे वचन देऊन मला व माझ्या सर्व चारित्र्यास किती संकटात टाकले होते. त्या बुद्धिवन्ताने भृंगाचे सहाय्याने माझी अडचण दूर केली हे खरे, परंतु मारूतीची युक्ती फसली असती तर ! आणि बाबारे मारूतीच्या या उपद्व्यापाने मला रामावतारातच त्रास झाला असे नाही तर कृष्णावतारातही मला त्याचा त्रास पुरवला. अत्यंत महत्त्वाकांक्षी, सपत्नीजनांशी पटवून न घेणारी, पतीवरची सत्ता यत्किंचितही कमी होऊ न देणारी अशी सत्यभामा. तिच्या पतीचे काय हाल झाले असतील हे तुला सांगणे अनावश्यक आहे. कारण असे ऐकतो की हल्ली विसाव्या शतकात भारतात सीता, सावित्री, रुक्मिणी यांच्यापेक्षा सत्यभामाच अधिक आहेत. शत्रुघ्नाचा तूं उल्लेख केलेला नाही, पण तोही इतर भावांपेक्षा कोणत्याही बाबतीत कमी नव्हता. वनवासाच्या काळात अयोध्येच्या राज्याची धुरा भरताने धरली असली तरी त्याने आपली तपस्वी वृत्ती टाकली नव्हती, आणि त्या काळात राज्याच्या सर्व समस्या, विवंचना शत्रुघ्नालाच कराव्या लागत होत्या. तात्पर्य माझे तिघे बन्धु व हनुमन्त यांचे व्यक्तित्व अत्युच्च दर्जाचे होते, ते माझे सेवक नसून मी त्यांचा सेवक होतो, आणि मजजवळ जे काही अल्पस्वल्प त्यांना देण्यासारखे होते ते त्यांना स्वीकारावयाचे नव्हते. त्याना त्यांच्या श्रीरामास सतत त्यांच्या हृदयांच्या बंदिवासात ठेवावयाचे होते. अशा स्थितीत त्यांच्यासाठी मी काय करू शकलो असतो, हे भक्तश्रेष्ठा, तूंच सांग.

शिवाय असे पहा की मी माझ्या बंधूंसाठी वा उर्मिलेसाठी काहीच केले नाही हा तुझा दावा सत्य नाही. वनवासातून परत आल्यानंतर मी लक्ष्मणाला यौवराज्याचा अभिषेक करावयाचे ठरविले. परंतु जणू काय मी त्यास महान संकटात घालीत आहे अशा वृत्तीने त्याने माझे म्हणणे नाकारले व वसिष्ठ गुरुंच्या मदतीने ते मला मागे घ्यावयास लावले. यौवराज्यपद स्वीकारावयास भरताचीही किती मिनतवारी करावी लागली. वसिष्ठांनी मध्यस्थी केली नसती तर भरतानेही माझे म्हणजे मान्य केले नसते. यावेळी माझ्या या भावांच्या मनात असा विचार आला नाही की चवदा वर्षांचा वनवास व रावणाशी झालेले युद्ध यापासून श्रांत झालेल्या श्रीरामास काही काळ तरी जबाबदाऱ्यांपासून मोकळे ठेवावे. तसे माझ्या भावांनी केले असते तर प्राणप्रिय सीतेचा त्याग मला कशासाठी करावा लागला असता, आणि आजच्या विसाव्या शतकातील स्वतंत्र आचारांच्या, विचारांच्या, व प्राज्ञत्व पावलेल्या

महिला मला जे बोल लावीत आहेत ते कशाला ऐकावे लागले असते ? चवदा वर्षांच्या दगदगीनंतर सीतेसह व मुलांसह मला एकाद्या आश्रमात माझे आयुष्य शांततेने व्यतीत करता आले नसते काय ?

हनुमानाची तऱ्हा तर काय औरच होती. सीतेने त्याला आपल्या गळ्यातली रत्नमाला दिली, आणि हे गृहस्थ आपल्या स्वभावानुसार झाडावर जाऊन त्यातील एकेक मणि दाताने फोडून पाहू लागले. माझं सोडून द्या परंतु सर्वस्वी सदाकाळ निरिच्छ असलेल्या लक्ष्मणासही याचा राग आला, आणि कपिराज म्हणतात काय ? मण्यांत राम आहे किंवा नाही हे पहातो, राम नसल्यास हे मणी आणि ही माला मला काय करावयाची ? जणु काय श्रीराम म्हणजे त्यांचा हृदयस्थ बंदिवान ! आपल्या हृदयस्थ पंजरात श्रीरामास बंदिस्त करून त्याला इकडे तिकडे वावरू न देणारे बंधू व सेवक पाहिले म्हणजे मग—

असंभवं हेममृगस्य जन्म तथापि रामो लुलुभे मृगाय ।
प्रायः समापन्नविपत्तिकाले धियोऽपि पुंसां मलिना भवन्ति ॥

उर्मिलेच्या बाबतीत मी काही जास्त सांगत नाही. ध्येयवादी पुरुषाच्या पत्नीस स्वीकारावी लागणारी दुःखे तिने आनंदाने स्वीकारली होती. तिची पतीवरील निष्ठा व त्याच्यावरील प्रेम अनन्य होते. जनकाचीच ती कन्या. तिच्यासारख्या त्यागी विरागी स्त्रियांचा आजच्या विसाव्या शतकातही लोप झालेला नाही. भारतात या काळात होऊन गेलेल्या क्रांतिकारांचे पोवाडे तूं रचतोस व गातोस त्यावेळी त्यांच्या धीरोदात्त विरहिणी पत्न्यांच्या मूर्ती तुझ्या डोळ्यासमोर उभ्या रहात नाहीत काय ? या विसाव्या शतकातील एक प्राध्यापिका सौ. मंगला द. वेलणकर यांनी "आकाशाशी नाते माझे" या उर्मिलाजीवनावर रचलेल्या नाटकात उर्मिलेकडून खालीलप्रमाणे वदविले आहे ते खोटे आहे काय याचा तूंच विचार कर.—

" **रामः**—समजूतदार आहेस तू उर्मिले. पण माझ्या या जीवनचरित्रांत तुलाही फार भोगावं लागलंय. फार उपेक्षा तुझ्या वाटेला—

**लक्ष्मण—**:असं का बोलता दादा—

**उर्मिला**:—भावजी, माझी नाही हो उपेक्षा झाली. आपल्या अयोध्या नगरीनं मला फार जपलं. माझ्या दुःखानं ती रडली. माझ्याबरोबर तिनं हि विरहिणीच जिणं कंठलं. या अयोध्येनं सार काही पाहिलं,भोगलं अन् सावरलं.आता तर आपल्या आशीर्वादानं पुत्रवतीच भाग्य प्राप्त झाल. पण-पण ज्या अयोध्येने मला जपलं तिनंच ताईचा अव्हेर केला. अखेर ताई म्हणाली तेच खरं. माझ्या नशीबी ऐश्वर्य आणि तिच्या नशिबी कायम वनवास. ''

असो. माझं हे उत्तर बरंच लांबलं आहे. अधिक लांबले तर साईलीलेचे संपादक जागा नाही म्हणून ते स्वीकारणार नाहील आणि तुझ्यापर्यंत कदाचित ते पोहोंचणार नाही. म्हणून आटोपते घेतो तत्पूर्वी तुला एवढीच विनंती करतो की राम मोठा की भरत मोठा, सीतेचा त्याग अधिक का उर्मिलेचा त्याग अधिक, लक्ष्मण श्रेष्ठ भक्त का हनुमान श्रेष्ठ भक्त या शुष्क वादांपासून अलिप्त राहून आपल्या शाहिरीचा उपयोग रामायणात जी चिरंतन मूल्ये वाल्मीकींनी सांगितली आहेत व ज्यांत तुळसीदास, एकनाथ रामदास वगैरे सन्तांनी भर घातली आहे त्यांचा प्रचार करण्याकरता केलास तर बरेंच कार्य होईल. तसा तो तूं केलास व या तत्त्वांची व मूल्यांची महती मारुती-प्रमाणे सूर्यावर झेंप घालू पहाणाऱ्या तरुण मनांवर बिंबविलीस तर तू फार मोठे कार्य करशील. तरी तसे तूं करावेस अशी तुझी प्रार्थना करून तुझ्या सर्व शंकाकुशंकाचे निरसन व्हावे व रामायण, महाभारत भगवद्गीता यासारख्या ग्रंथांतून सांगितलेल्या तत्त्वांनी, चिरंतन मूल्यांनी व नीतीनियमांनी भारताचेच नव्हे तर सर्व विश्वाचे सांस्कृतिक व ऐहिक जीवन समृद्ध व्हावे व ज्ञानदेवांच्या प्रार्थनेवरुन भगवान श्रीकृष्णाने केलेले पसायदान सर्वांच्या अनुभवास फिरुन यावे असा आशीर्वाद तुला देतो.

तुझ्यासारख्या भक्ताच्या हृदयात सदैव असणारा,

**रामचंद्र**

ॐ शान्तिरस्तु पुष्टिरस्तु ।

# साध्वी उर्मिला

लेखिका–कुमारी प्रार्थना नारायण चिपळूणकर, बी. ए.

सुप्रसिद्ध संस्कृत कवी रामायणकार वाल्मीकि यांच्या रामायणात राम - सीता हाच विषय प्रामुख्याने हाताळलेला दिसतो. सीता ही जनक कन्या त्याला सापडलेली आहे. परंतु स्वतःच्या पोटच्या मुलीप्रमाणे त्याने जीव लावून प्राणापलीकडे तिच्यावर प्रेम केले आहे. अशी ही सर्वगुणसंपन्न मैथिली रामाने जिंकली.

रामाच्या आयुष्यात सीतेला फार महत्त्वाचे स्थान आहे. रामाबरोबर वनवासातही ती गेली. राजप्रासाद आणि वैभव मागे सोडून रानावनात झोपडीत केवळ पतीसाठी तिने आयुष्य घालविले. निःसंशय ती पतिव्रता होती. तिच्याइतके हाल कोणी भोगले नसतील, सोसलेही नसतील. 'पंचकंनां स्मरेन्नित्यं' यांत सीतेचे नाव प्रामुख्याने उल्लेखिले जाते.

दशरथाला तीन भार्या आणि चार पुत्र होते. कौसल्येचा राम, सुमित्रेचा लक्ष्मण आणि शत्रुघ्न आणि कैकेयीचा भरत ! राम आणि लक्ष्मण यांच्यातील बंधुप्रेम केवळ अतुलनीयच असा त्याचा उल्लेख आजवर केला जातो. त्यांचे सारेच आयुष्य एकमेकांच्या निकट सहवासात गेले. लक्ष्मणाची रामावर अन्यन्य श्रद्धा, भक्ति आणि प्रीति होती. त्याच्यासाठी लक्ष्मणानेही वनवास स्वीकारला. कैकेयीच्या घोर, पातकी आणि कठोर राजकारणाच्या पडद्याखाली सीता आणि उर्मिला यांच्या सारख्या कोमल बालिकांची नाजूक हृदये करपून गेली.

भूमीच्या उदरी सीता सापडल्यानंतर उर्मिलेचा जन्म झाला. उर्मिला व सीता ह्या दोघीही सख्या बहिणींप्रमाणे उत्कट प्रेमात आणि वैभवात वाढल्या. परंतु सीतेचे लाड माहेरी आणि सासरी दोन्हीकडेही सारखेच झाले अणि उर्मिला मागे राहिली. रूपागुणात दोघीही सारख्याच होत्या आणि एकाच घरात आल्या होत्या. सीता आणि उर्मिला यांचे विवाह दशरथपुत्र राम आणि लक्ष्मण यांच्यांशी झाले होते. जनकाच्या पुतण्या माण्डवी आणि श्रुतकीर्ति अनुक्रमे भरत व शत्रुघ्न यांना दिल्या होत्या.

